# || अथ श्रीसाईसच्चरित || अध्याय ६ वा ||

|| श्रीगणेशाय नमः ||

|| श्रीसरस्वत्यै नमः ||

|| श्रीगुरुभ्यो नमः ||

|| श्रीकुलदैवतायै नमः ||

|| श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ||

|| श्रीसद्गुरुसाईनाथाय नम : ||

असो परमार्थु वा संसारू । जेथे सद्गुरु कर्णधारू ।
तेंचि तारूं पैलपारू । नेऊनि उतारू लावील || १ ||

सद्गुरु-शब्दें वृत्ति उठतां । साईच प्रथम आठवती चित्ता ।
उभेच ठाकती सन्मुखता । ठेविती माथां निजहस्त || २ ||

धुनीमाजील उदीसमन्वित । पडे जंव मस्तकीं वरदहस्त ।
हृदय स्वानंदे उलूनि येत । प्रेम ओसंडत नेत्रांतुनि || ३ ||

नवल गुरुहस्तस्पर्शविदान । प्रलयाग्नीतही न होई जो दहन ।
त्या सूक्ष्मदेहाचें करी ज्वलन । भस्मीभवन करस्पर्शें || ४ ||

चुकूनि देवाची कथा वार्ता । निघाल्या उठे तिडीक माथां ।
वाचा प्रवाहे बाष्कळता । तयाही स्थिरता लाघावी || ५ ||

शिरीं ठेविंता करकमल । अनेका जन्मींचे परिपक्व मल ।
जाती धुंवूनि होती निर्मल । भक्त प्रेमळ साईचे || ६ ||

रूप पाहांता ते गोमटें । परमानंदे कंठ दाटे ।
नयनी आनंदा पाझर फुटे । हृदयी प्रकटे अष्टभाव || ७ ||

सोहंभावास जागवीत । निजानंदास प्रकटवीत ।
ठायींच मीतूंपणा विरवीत । सामरस्यें अद्वैत मिरवी || ८ ||

वाचूं जातां पोथीपुराण । पावलोपावली सद्गुरुस्मरण ।
साईच नटे रामकृष्ण । करवी श्रवण निजचरित्र || ९ ||

परिसूं बैसता भागवत । कृष्णचि साई नखशिखांत ।
वाटे गाई तें उध्दवगीत । भक्तनिजहित साधाया || १० ||

सहज बसावे करूं वार्ता । तेथेंही साईनाथांची कथा ।
अकल्पितची आठवे चित्ता । योग्य दृष्टांता द्यावया ।। ११ ।।

कागद घेउनि लिहूं म्हणतां । अक्षरीं अक्षर येई न जुळविंता ।
परी तोचि जेव्हां लिहवी स्वसत्ता । लिहितां लिहितां लिहवेना ।। १२ ।।

जंव जंव अहंभाव डोकावत । निजकरें तया तळी दडपीत ।
वरी करोनि निज शक्तिपात । शिष्यास कृतार्थ करीत ते ।। १३ ।।

काया - वाचा - मनें येतां । लोटांगणी साई समर्था ।
धर्मार्थ - काम - मोक्ष हाता । चढती न मागता आपैसे ।। १४ ।।

कर्म ज्ञान योग भक्ती । या चौमार्गी ईश्वरप्राप्ती ।
जरी हीं चार चौबाजूं निघती । तरीही पोंचविती निजटाया ।। १५ ।।

भक्ती ही बाभुळवनींची वाट । खांचा खळगे अति बिकट ।
एकपावली परी ती नीट । हरीनिकट नेई कीं ।। १६ ।।

कांटा टाळूनि टाका पाय । हाचि एक सुलभ उपाय ।
तरीच निजधाम पावाल निर्भय । निक्षूनि गुरुमाय वदे हें ।। १७ ।।

मनाचे मळे जैं भक्तीं शिंपिलें । वैराग्य खुले ज्ञान फुले ।
कैवल्य फळे चित्सुख उफळे । अचूक चुकलें जन्ममरण ।। १८ ।।

मूळ परमात्मा स्वयंसिध्द । तोचि सच्चिदानंद त्रिविध ।
उपाधियोगें झाला प्रबुध्द । प्रकट बोध भक्तार्थ ।। १९ ।।

जैसा तो या त्रैगुण्यें व्यक्त । मायाही होऊनि क्रियाप्रयुक्त ।
सत्त्व-रज-तमा चाळवीत । करी सुव्यक्त निजगुण ।। २० ।।

मृतिकेचा विशिष्ट आकार । तया नाम घट साचार ।
घट फुटतां नाम रूप विकार । निघूनि पार जातात ।। २१ ।।

हें अखिल जग मायेपासाव । परस्परां कार्यकारणभाव ।
मायाचि प्रत्यक्ष सावयव । होऊनि उद्भवली जगरूपें ।। २२ ।।

जगाआधीं मायेची स्थिती । पाहूं जातां नाही व्यक्ति ।
परमात्मरूपीं लीन होती । परम अव्यक्तीं संचली ।। २३ ।।

व्यक्त होतांही परमात्मरुप । अव्यक्त तरी ही परमात्मरूप ।
एवंच ही माया परमात्मरूप । अभेदरूप परमात्मीं ।। २४ ।।

मायेनें तमोगुणापासून । केले जडपदार्थ निर्माण ।
निर्जीव चलनवलनशून्य । क्रिया पूर्ण ही प्रथम ।। २५ ।।

मग मायेच्या रजोगुणीं । परमात्मचिद्गुणाची मिळणी ।
होतां उघडली चैतन्यखाणी । स्वभावगुणीं उभयांचे ।। २६ ।।

पुढें या मायेचा सत्त्वगुण । करी बुध्दितत्त्व निर्माण ।
तेथ परमात्म्याचा आनंदगुण । मिसळतां खेळा संपूर्णता ।। २७ ।।

एवं माया महाविकारी । क्रियोपाधि जों न स्वीकारी ।
पूर्वोक्त पदार्थातें न करी । त्रिगुण तोंवरी अव्यक्त ।। २८ ।।

गुणानुरूप क्रिया कांहीं । न करितां माया व्यक्त नाहीं ।
राहूं शके अव्यक्त पाहीं । स्वयें जैं सेवी अक्रियत्त्व ।। २९ ।।

'सर्व खल्विदं ब्रम्ह'-त्वाचें । ऐक्य तिहींचे तें हेंचि ।। ३० ।।

ऐसी जे हे अभेदप्रतीति । कैसेनि प्राप्त होय निश्चितीं ।
ऐसी उत्कटेच्छा जया चित्तीं । वेद श्रुति पहावी ।। ३१ ।।

सारासार विचारशक्ति । वेदशास्त्र-श्रुति-स्मृति ।
गुरू-वेदांत-वाक्यप्रतीति । परमानंदप्राप्ति दे ।। ३२ ।।

'माझिया भक्तांचे धामीं । अन्नवस्त्रास नाहीं कमी' ।।
ये अर्थी श्रीसाई दे हमी । भक्तांसी नेहमी अवगत ।। ३३ ।।

'मज भजती जे अनन्यपणें । सेविती नित्याभियुक्तमनें ।
तयांचा योगक्षेम चालविणें । ब्रीद हें जाणें मी माझें ' ।। ३४ ।।

हेंचि भगवद्गीतावचन । साई म्हणती माना प्रमाण ।
नाहीं अन्नावस्त्राची वाण । तदर्थ प्राण वेंचूं नका ।। ३५ ।।

देवद्वारीं मान व्हावा । देवापुढेंचि पदर पसरावा ।
तयाचाच प्रसाद जोडावा । मान सोडावा लौकिकीं ।। ३६ ।।

काय लोकीं मान डोलविली । तितुक्याने का भरसी भुली ।
आराध्यमूर्तिं चित्तीं द्रवली । धर्मे डबडबली पाहिजे ।। ३७ ।।

हेंचि ध्येय लागो गोड । सर्वेंद्रियीं भक्तीचें वेड ।
इंद्रियविकारां भक्तीचे मोड । फुटोत कोड मग काय ।। ३८ ।।

सदैव एसें भजन घडो । इतर कांहींहीं नावडो ।
मन मन्नामस्मरणीं जडो । विसर पडो अवघ्याचा ।। ३९ ।।

नाहीं मग देह-गेह-वित्त । परमानंदी जडेल चित्त ।
मन समदर्शी आणि प्रशांत । परिपूर्ण निश्चित होईल ।। ४० ।।

सत्संग केलियाची खूण || वृत्तीसी पाहिजे समाधान |
नानाठायीं वसे जें मन | तें काय 'सल्लीन' म्हणावें || ४१ ||

तरी होऊनि दत्तावधान | श्रोतां भावार्थे परिसिजे निरूपण |
करितां हें साईचरित्र श्रवण | भक्तिप्रवण मन होवो || ४२ ||

कथासंगती होईल तृप्ति | लाधेल चंचलमना विश्रांति |
होईल तळमळीची निवृत्ति | सुखसंवित्ती पावाल || ४३ ||

आतां पूर्वील कथानुसंधान | मशीदीचें जीर्णोद्धरण |
रामजन्माचें कथाकीर्तन | चालवूं निरूपण पुढारां || ४४ ||

एक भक्त गोपाळ गुंड | जयासी बाबांची भक्ति उदंड |
मुखीं बाबांचे नांव अखंड | काळखंड ये रीती || ४५ ||

तयासी नव्हतें संतान | पुढें साईप्रसादेकरून |
पावता झाला पुत्ररत्न | चित्त प्रसन्न जाहलें || ४६ ||

झालें गोपाळ गुंडाचें मानस | यात्रा एक अथवा उरूस |
भरवावा शिर्डीग्रामी वर्षास | होईल उल्हास सर्वत्रां || ४७ ||

तात्या कोते दादा कोते | माधवरावादि प्रमुख जनांते |
रुचला विचार हा सकळांते | तयारीतें लागले || ४८ ||

परी या वार्षिक उत्सवालागून | आधी एक नियमनिर्बंधन |
जिल्हाधिकारी यांचे अनुमोदन | करणें संपादन आवश्यक || ४९ ||

तदर्थ उद्योग करूं जातां | गांवी जो एक कुळकर्णी होता |
कुत्सितपणे उलटा जातां | आला मोडता कार्यात || ५० ||

कुळकर्णी जो आडवा पडला | पहा कैसा परिणाम आला |
यात्रां भरू नये शिर्डीला | हुकूम झाला जिल्ह्याचा || ५१ ||

परी ही यात्रा भरावी शिर्डीत | बाबांचेही हेंचि मनोगत |
आज्ञा पूर्ण आशीर्वादयुक्त | होती तदर्थ झालेली || ५२ ||

ग्रामस्थांनी पिच्छा पुरविला | जिवापाड यत्न केला |
अधिकारियांनी हुकूम फिरविला | मान राखिला सकळांचा || ५३ ||

तेव्हांपासूनि बाबांच्या मतें | यात्रा ठरविली रामनवमीतें |
व्यवस्था पाहती तात्या कोते | यात्रा येते अपरंपार || ५४ ||

त्याच रामनवमीचे दिसीं । भजनपूजन समारंभेसीं ।
तासे चौघडे वाजंत्रेसीं । यात्रा चौपासी गडगंज ।। ५५ ।।

वर्षास दोन नवीं निशाणे । समारंभे होई मिरवणें ।
मशिदीचे कळसास बांधणे । तेथेंचि रोवणे अखेर ।। ५६ ।।

त्यांतील एक निमोणकरांचे । दुजें निशाण दामूअण्णांचें ।
मिरवणें होतें थाटामाटाचें । फडकतें कळसाचे अग्रभागी ।। ५७ ।।

पुढें रामनवमीचा उत्सव । उरुसापोटीं कैसा समुद्भव ।
परिसा तें कथानक अभिनव । स्वानंदगौरव शिर्डीचें ।। ५८ ।।

शके अठराशें तेहतीस सालीं । रामनवमी प्रथम झाली ।
उरुसापोटीं जन्मास आली । तेथूनि चालली अव्याहत ।। ५९ ।।

प्रसिध्द कृष्ण जागेश्वर भीष्म । तेथूनि या कल्पनेचा उगम ।
करावा रामजन्मोपक्रम । लाघेल परम कल्याण ।। ६० ।।

तेथपर्यंत केवळ उरूस । यात्रा भरत असे बहुबस ।
त्यांतूनि हा जन्मोत्सव सुरस । आला उदयास ते सालीं ।। ६१ ।।

एकदां भीष्म स्वस्थचित्त । वाडियामाजीं असतां स्थित ।
काका पूजासंभारसमवेत । जावया मशिदींत उद्युक्त ।। ६२ ।।

अंतरी साईदर्शन - काज । वरी उरुसाचीही मौज ।
काका आधींच एक रोज । शिर्डीत हजर उत्सवार्थ ।। ६३ ।।

पाहूनियां समय उचित । भीष्म तेव्हां काकांस पुसत ।
सद्वृत्ति एक मनीं स्फुरत । द्याल का मदत मजलागीं ।। ६४ ।।

येथें वर्षास भरतो उरूस । रामजन्माचा हा दिवस ।
तरी जन्मोत्सव संपादयास । आहे अनायास ही संधी ।। ६५ ।।

काकांस आवडला तो विचार । घ्या म्हणाले बाबांचा होकार ।
आहे तयांच्या आज्ञेवर । कार्यासी उशीर नाही मग ।। ६६ ।।

परी उत्सवा लागे कीर्तन । उभा राहिला तोही प्रश्न ।
खेडेगांवी हरिदास कोठून । ही एक अडचण राहिली ।। ६७ ।।

भीष्म म्हणती कीर्तनकार । तुम्ही धरा पेटीचा स्वर ।
राधाकृष्णाबाई तयार । सुंठवडा वेळेवर करितील ।। ६८ ।।

चला कीं मग बाबांकडे । विलंब हें शुभकार्या सांकडें ।
शुभासी जैं शीघ्रत्व जोडे । साधे रोकडें तैं कार्य ।। ६९ ।।

चला आपण पुसावयास । आज्ञा कीर्तन करावयास ।
ऐसें म्हणतांच मशिदीस । दोघे ते समयास पातले ।। ७० ।।

काका आरंभ करितां पूजेतें । बाबाच जाहले प्रश्न पुसते ।
काय वाड्यांत चाललें होतें । सुचेना तें काकांना ।। ७१ ।।

तात्काळ बाबा भीष्माप्रती । तोच प्रश्न अन्यरीतीं ।
कां बुवा काय म्हणती । म्हणवूनि पुसती तयांते ।। ७२ ।।

तेव्हां काकांस आठव झाला । उद्दिष्टार्थ निवेदियेला ।
विचार बाबांचे मनास रुचला । निश्चित केला उत्सव ।। ७३ ।।

दुसरे दिवशीं प्रातःसमयाला । पाहूनि बाबा गेले लेंडीला ।
सभामंडपी पाळणा बांधिला । थाट केला कीर्तनाचा ।। ७४ ।।

पुढें वेळेवरी श्रोते जमले । बाबा परतले भीष्म उठले ।
काका पेटीवर येऊन बैसले । बोलावूं पाठविलें तयांना ।। ७५ ।।

'बाबा बोलाविती तुम्हांस' । ऐकतां काकांचे पोटीं धस्स ।
काय झालें न कळे मनास । कथेचा विसर ना होवो ।। ७६ ।।

ऐकूनि बाबांचे निमंत्रण । काकांची तेथेंचि झाली गाळण ।
बाबा कां बरें क्षुब्ध मन । निर्विघ्न कीर्तन होईल ना ।। ७७ ।।

पुढें चालती मागें पहाती । भीत भीत पायऱ्या चढती ।
मंदमंद पाउलें पडती । चिंतावर्ती बहु काका ।। ७८ ।।

बाबा तयांस करिती विचारणा । कशास येथें बांधिला पाळणा ।
कथातात्पर्य आणि योजना । ऐकूनि मना आनंदले ।। ७९ ।।

मग तेथें जवळ निंबर । तेथूनि घेऊनि एक हार ।
घातला काकांच्या कंठी सुंदर । भीष्माकरितां दिला दुजा ।। ८० ।।

पाळण्याचा प्रश्न परिसतां । उपजली होती मोठी चिंता ।
परी गळां तो हार पडतां । सर्वांस निश्चितता जाहली ।। ८१ ।।

आधींच भीष्म बहुश्रुत । विविधकथापारंगत ।
कीर्तन जाहले रसभरित । आनंद अपरिमित श्रोतयां ।। ८२ ।।

बाबाही तैं प्रसन्नवदन । जैसें दिधलें अनुमोदन ।
तैसाचि उत्सव घेतला करवून । कीर्तनभजनसमवेत ।। ८३ ।।

रामजन्माचिया अवसरीं । गुलाल बाबांच्या नेत्रांभीतरी ।
जाऊनि प्रकटले बाबा नरहरी । कौसल्येमंदिरीं श्रीराम ।। ८४ ।।

गुलालाचें केवळ मिष । रामजन्माचा तो आवेश ।
होईल अहं-रावणाचा नाश । दुर्वृत्ती-राक्षस मरतील ।। ८५ ।।

एकाएकीं आला कोप । प्रत्यक्ष नरसिंहाचें रूप ।
सुरू झाले शिव्याशाप । वर्षाव अमूप जाहला ।। ८६ ।।

पाळण्याचे होतील तुकडे । राधाकृष्णा मनीं गडबडे ।
राहील कैसा धड से सांकडे । येऊनि पडे तिजलागीं ।। ८७ ।।

सोडा सोडा लवकर सोडा । पाठीसी लागतां तिचा लकडा ।
काका सरकले पुढां । पाळणा सोडावयातें ।। ८८ ।।

तंव तों बाबा अति कावले । काकांचिया अंगावर धांवले ।
पाळणा सोडणें जागींच राहिलें । वृत्तीवर आले बाबाही ।। ८९ ।।

पुढें दुपारीं आज्ञा पुसतां । बाबा काय वदले आश्चर्यता ।
एव्हांच कैंचा पाळणा सोडितां । आहे आवश्यकता अजून ।। ९० ।।

ही आवश्यकता तरी कसली । अन्यथा नव्हे साई-वचनावली ।
विचार करितां बुध्दि स्फुरली । सांगता न झाली उत्सवाची ।। ९१ ।।

येथवरी उत्सव झाला । दुसरा दिन जों नाहीं उगवला ।
नाहीं झाला जों गोपाळकाला । उत्सव सरला न म्हणावें ।। ९२ ।।

एणेप्रमाणें दुसरे दिनीं । गोपाळकाला कीर्तन होऊनी ।
पाळणा मग सोडायालागुनी । आज्ञा बाबांनी दीधली ।। ९३ ।।

पुढील वर्षी भीष्म नव्हते । बाळाबुवा सातारकरांतें ।
कीर्तनार्थ आणविणे होतें । जाणे कवठ्यातें तयांना ।। ९४ ।।

म्हणूनि बाळाबुवा भजनी । प्रसिध्द 'अर्वाचीन तुका' म्हणूनि ।
घेऊनि आले काका महाजनी । उत्सव त्यांहातूनि करविला ।। ९५ ।।

हेही जरी मिळाले नसते । काकाच किर्तनार्थ उभे रहाते ।
दासगणूकृत आख्यान त्यांते । पाठचि होतें नवमीचें ।। ९६ ।।

तिसरे वर्षी सातारकर । बाळाबुवांचेच शिर्डीवर ।
आगमन जाहलें वेळेवर । कैसें सादर परिसा तें ।। ९७ ।।

ऐकूनि साईबाबांची कीर्ति । दर्शनकाम उद्भवला चित्तीं ।
परी मार्गात पाहिजे संगती । लाभेल केउती ही इच्छा ।। ९८ ।।

बाळाबुवा स्वयें हरिदास । साताऱ्याकडे मूळ रहिवास ।
मुंबापुरीं परेळास । होता निवास ये समयी ।। ९९ ।।

बिऱ्हाड सिध्दकवठे म्हणून । सातारा जिल्ह्यांत देवस्थान ।
तेथें रामनवमीचें कीर्तन । वर्षासन बुवांस ।। १०० ।।

आषाढीची एकादशी । रामनवमी चैत्रमासीं ।
या दोन वार्षिक उत्सवांसी । बाळाबुवांसी संबंध ।। १०१ ।।

बादशाही सनद पाहतां । बडे बाबांचे खर्चाकरितां ।
रुपये चतुर्विशती शतां । मूळ व्यवस्था संस्थानीं ।। १०२ ।।

असो या दोन उत्सवालागीं । रुपये त्रिंशत बुवांची बिदागी ।
परी ते वर्षी कवठ्यास मरगी । पडले प्रसंगी ग्रामस्थ ।। १०३ ।।

तेणें रामनवमी राहिली । बुवांस तेथूनि पत्रे आलीं ।
यावें आतां पुढील सालीं । ग्रामचि खालीं झालासे ।। १०४ ।।

सारांश रामाची सेवा चुकली । बिदागीही जागी रहिली ।
शिर्डीस जावया संधी फावली । भेट घेतली दीक्षितांची ।। १०५ ।।

दीक्षित बाबांचे परम भक्त । शिरडी - गमनाचा मनोगत ।
पुरेल त्यांनी आणितां मनांत । स्वार्थ परमार्थ साधेल ।। १०६ ।।

वदती तैं ते दीक्षितांलागून । यंदा राहिलें वर्षासन ।
घ्यावें वाटे बाबांचे दर्शन । तेथेंचि कीर्तन करावे ।। १०७ ।।

भाऊसाहेब तेव्हां वदती । बिदागीची नाहीं निश्चिती ।
देणें न देणें बाबांचे हातीं । लागेल संमति कीर्तनासी ।। १०८ ।।

इतुकें संभाषण चाललें असतां । काका महाजनी येऊनि अवचिता ।
शिरडीप्रसाद उदी वांटितां । शुभशकुनता गमली ते ।। १०९ ।।

तेच वेळीं महाजनी । आले होते शिरडीहुनी ।
क्षेमकुशलवृत्त कळवूनी । मग निजसदनी परतले ।। ११० ।।

असो पुढें बुवांप्रती । दीक्षित तेव्हां परम प्रीतीं ।
म्हणती विचारीन बाबांची संमती । दिधल्या निश्चिती कळवीन ।।१११।।

पत्र येतां शिरडीस यावें । वाटखर्चीलागीं न भ्यावें ।
तदर्थ नलगे आपणां झिजावें । निःशंक असावें मनांत ।। ११२ ।।

असो पुढें दीक्षित गेले । बाबांनी अनुमोदनही दिधलें ।
बाळाबुवा शिरडीस आले । दर्शन घडलें यथेष्ट ।। ११३ ।।

साईबाबांहीं सन्मुख सगळा । रामनवमीचा उत्सव सोहळा ।
बाळाबुवांच्या हस्ते घेतला । करवूनि नवलाव प्रेमाने ।। ११४ ।।

बाळाबुवाही मनीं तुष्टले । चिंतिलें कार्य पार पडलें ।
साईही प्रसन्नचित्त जाहले । मनोरथ पुरले बुवांस ।। ११५ ।।

संभावनाही यथास्थित । शतोपरी पंचाशत ।
रुपये घ्यावया आज्ञा होत । आनंद अपरिमित बुवांस ।। ११६ ।।

पंचवार्षिक कवठ्याची प्राप्ति । एकाच उत्सवीं बाबा देती ।
बाळाबुवा कां न आनंदती । आभारी होती बाबांचे ।। ११७ ।।

असो पुढें एके दिवशीं । दासगणू येतां शिर्डीसी ।
देवविला प्रार्थूनि बाबांसी । उत्सव प्रतिवर्षी तयांस ।। ११८ ।।

तेथूनि पुढें हा कालवरी । होता हे जन्मोत्सव गडगजरीं ।
अन्नसंतर्पण आकंठवरी । महारापोरी आनंद ।। ११९ ।।

समाधीच्या महाद्वारी । मंगल वाद्यांचिया गजरीं ।
साई - नामघोष अंबरी । आनंदनिर्भरीं कोंदाटे ।। १२० ।।

जैसी यात्रा वा उरूस । तैसेंच स्फुरलें गोपाळ गुंडास ।
कीं त्या जीर्ण मशिदीस । रूप गोंडस आणावे ।। १२१ ।।

मशिदीचाही जीर्णोद्धार । व्हावा आपुले हस्ते साचार ।
भक्त गोपाळ गुंडाचा निर्धार । पाषाण तयार करविले ।। १२२ ।।

परी हा जिर्णोध्दारयोग । नव्हता वाटे गुंडाचा भाग ।
या विशिष्ट कार्याचा सुयोग । आला मनाजोगा पुढारा ।। १२३ ।।

वाटे बाबांच्या होतें मनीं । करावे हें नानांनीं ।
फरसबंदी मागाहुनी । करावी काकांनी तदनंतर ।। १२४ ।।

तैसेंचि पुढें घडूनि आलें । आधी आज्ञा मागतां थकले ।
म्हाळसापतीस मध्यस्थी घातले । अनुमोदन दिधले बाबांहीं ॥ १२५ ॥

असो जेव्हां मशिदीसी । निशींत एका झाली फरसी ।
तेथूनि मग दुसरेच दिवशीं । बाबा गादीसी बैसले ॥ १२६ ॥

अकरा सालीं सभामंडप । तोही प्रचंड खटाटोप ।
केवढा तरी महाव्याप । जाहला थरकांप सकळिकां ॥ १२७ ॥

तेंही कार्य येचि रीतीं । ऐसीच सकल परिस्थिति ।
असतां पूर्ण केलें भक्तीं । एके रात्रींत सायासें ॥ १२८ ॥

रात्रीं प्रयासे खांब दाटावे । सकाळीं बाबांनी उपटूं लागावें ।
अवसर साधूनि पुन्हां चिणावे । ऐसें शिणावें सकळिकीं ॥ १२९ ॥

सर्वांनी घालावी कास । करावा रात्रीचा दिवस ।
पुरवावा मनाचा हव्यास । अति सायास सोसूनि ॥ १३० ॥

आधीं येथें उघडें आंगण । होतें इवलेंसें पटांगण ।
सभामंडपा योग्य स्थान । जाहलें स्फुरण दीक्षितां ॥ १३१ ॥

लागेल तितुका पैका लावून । लोहाचे खांब कैच्या आणून ।
बाबा चावडीसी गेलेस पाहून । काम हें साधून घेतलें ॥ १३२ ॥

भक्तांनी रात्रीचा करावा दिवस । खांब चिणावे करूनि सायास ।
चावडींतूनि परतण्याच अवकाश । लागावें उपटण्यास बाबांनी ॥ १३३ ॥

एकदां अत्यंत कोपायमान । एका हातीं तात्यांची मान ।
दुजियानें एका खांबांस हालवून । उपटून काढूं पहात ॥ १३४ ॥

हाल हालवूनि केला ढिला । तात्यांचे माथ्याचा फेटा काढिला ।
कांडें लावून पेटवूनि दिला । खड्ड्यांत टाकिला त्वेषानें ॥ १३५ ॥

तया समयींचे ते डोळे । दिसत जैसे अनल गोळे ।
सन्मुख पाहील कोण त्या वेळे । धैर्य गेलें सकळांचें ॥ १३६ ॥

लगेच खिशांत हस्त घातला । रुपया एक बाहेर काढिला ।
तोही तेथेंचि निक्षेपिला । जाणों तो केला सुमुहूर्त ॥ १३७ ॥

शिव्याशापांचा वर्षाव झाला । तात्याही मनीं बहु घाबरला ।
प्रसंग बहु बिकट आला । प्रकार घडला कैसा हा ॥ १३८ ॥

जन लोक विस्मयापन्न । हें काय आज आहे दुश्चिन्ह ।
तात्या पाटलावरील हें विघ्न । होईल निवारण कैसें कीं ।। १३९ ।।

भागोजी शिंद्याने धीर केला । हळूहळू पुढें सरकला ।
तोही आयताच सांपडला । यथेष्ट घुमसिला बाबाहीं ।। १४० ।।

माधवरावही हातीं लागले । तेही विटांचा प्रसाद पावले ।
जे जे मध्यस्थी करावया गेले । वेळींच अनुग्रहिले याचांही ।। १४१ ।।

बाबांपुढे जाईल कोण । केवीं तात्याची करावी सोडवण ।
म्हणतां म्हणतां क्रोधही क्षीण । झाला शमन बाबांचा ।। १४२ ।।

तात्काळ दुकानदार बोलाविला । जरीकांठी फेटा आणविला ।
स्वयें तात्याचे डोक्यास बांधविला । शिरपाव दिधला जणूं त्यास ।। १४३ ।।

आश्चर्यचकित लोक झाला । काय कारण या रागाला ।
किमर्थ तात्यावरी हा हल्ला । केला गिल्ला बाबांनीं ।। १४४ ।।

कोपास चढले किंनिमित्त । क्षणांत पाहतां प्रसन्नचित्त ।
यांतील कारण यत्किंचित । कोणासही विदित होईना ।। १४५ ।।

कधीं असत शांतचित्त । प्रेमे गोष्टी वार्ता वदत ।
कधीं न लागतां निमिष वा निमित्त । क्षुब्ध चित्त अवचित ।। १४६ ।।

असो ऐशा या बाबांच्या गोष्टी । एक सांगता एक आठवती ।
सांगूं कोणती ठेवूं कोणती । प्रपंचवृत्ती बरवी ना ।। १४७ ।।

करवे न मजही आवड निवड । जैसी जिला मिळेल सवड ।
तैसी ती श्रोतयांची होड । श्रवणकोड पुरवील ।। १४८ ।।

पुढील अध्यायीं करावें श्रवण । वृध्दमुखश्रुत पूर्वकथन ।
साईबाबा हिंदू कीं यवन । करूं निरूपण यथामति ।। १४९ ।।

दक्षिणामिषें घेऊनि पैसा । जीर्णोध्दारार्थ लाविला कैसा ।
धोती पोती खंडदुखंडसा । देह कैसा दंडीत ।। १५० ।।

कैसे परार्थ वेठीत कष्ट । निवारीत भक्तसंकट ।
पुढील अध्यायी होईल स्पष्ट । श्रोते संतुष्ट होतील ।। १५१ ।।

स्वस्ति श्रीसंतसज्जनप्रेरिते । भक्तहेमाडपंतविरचिते ।
श्रीसाईसमर्थसच्चरिते । रामजन्मोत्सवादि कथनं नाम षष्ठोध्यायः संपूर्णः ।। ।।

|| श्रीसद्गुरुसाईनाथार्पणमस्तु || शुभं भवतु ||

# मर्यादापुरुषोत्तम श्रीराम

❑ स्व. म. म. बाळशास्त्री हरिदास



रामायणातील महान व्यक्तिचित्रांच्या महत्तेला ज्याच्यामुळे महत्त्व येते व ज्याच्या विभूतिमत्त्वाची पकड भारतीय मनावर सदैव बसलेली आहे असे महर्षी वाल्मीकींच्या प्रतिभेने निर्माण केलेले व्यक्तिचित्र महर्षींच्या प्रतिभेने स्वतंत्र्यपणे उत्पन्न केलेले नाही. त्यांना एक अत्यंत श्रेष्ठ व सर्व गुणांचा उत्कटतेने ज्याच्या व्यक्तिमत्त्वात अविष्कार झालेला आहे, अशी व्यक्ती हवी होती. तिची माहिती त्यांना देवर्षी नारदाकडून कळली. तिचा संपूर्ण इतिहास नारदांसारख्या श्रेष्ठ व्यक्तिकडून समजावून घेतल्यानंतरच महर्षींनी त्या व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचे तिच्या बारीकसारीक छटांसह ज्ञान करून घेतले व नंतरच त्यांनी या आपल्या अद्वितीय महाकाव्याचा संसार थाटलेला आहे. अशी गोष्ट वाल्मीकीय रामायणाच्या बालकांडाच्या पहिल्या व तिसऱ्या सर्गातच आलेली आहे. इतकेच नव्हे, तर त्यांनी लिहिलेले त्या भव्य व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप व तिच्या आयुष्यातील एकंदर घटना, त्या व्यक्तिलाच ऐकवून तिच्याकडून त्याच्या सत्यत्वाचे शिक्कामोर्तबही महर्षींनी करून घेतले असे बालकांडाच्या चवथ्या सर्गात वर्णन आहे. कल्पनेलाही अघटित वाटावे असे महनीय व्यक्तिमत्त्व महर्षींनी प्रत्यक्ष पाहिले. इतकेच नव्हे तर त्याच्या चरणी आपल्या प्रतिभेचे पुष्प समर्पण करण्याची संधी त्यांना लाभली, हे त्यांचे केवढे भाग्य म्हटले पाहिजे ! तात्पर्य रामायणातील रामचंद्रांचे व्यक्तिचित्र हे निवळ कल्पनाचित्र नसून वास्तवतेवर आधारलेले असे आहे. त्यामुळे त्याची क्षणोक्षणी वृध्दिंगत होणारी महत्ता पाहून तर मन आश्चर्याने अधिकच भरून जाते.

*स्व. महामहोपाध्याय बाळशास्त्री हरिदास यांच्या व्याख्यानाने अवघा महाराष्ट्र दुमदुमून टाकलेला आहे. त्यांचे विद्वत्तापूर्ण - सडेतोड आणि चिंतनात्मक असे विचार ऐकण्यास श्रोत्यांची प्रचंड गर्दी लोटत असे. त्यांचे रामायण - महाभारतावर विलक्षण प्रभूत्व होते. त्यांच्या व्याख्यानमालेतील 'मर्यादापुरुषोत्तम श्रीराम' हे पुष्प आम्ही रामनवमीच्या निमित्ताने वाचकांपूढे ठेवलेले आहे. वाचकांनी हा लेख वाचून स्व. शास्त्रीबुवांच्या समग्र ग्रंथांचा आस्वाद घ्यावा असा यामागे उद्देश आहे.*

## प्रभावी व्यक्तिमत्व

रामायणाच्या वाचकाला रामचंद्रांचा विचार करताना सर्वप्रथम कोणत्या एका गोष्टीचे आश्चर्य वाटत असेल तर ती गोष्ट म्हणजे त्याच्या लोकांवरील असामान्य प्रभुत्वाचे होय. आपल्यापेक्षा कनिष्ठांची तर गोष्टच वेगळी, पण अधिकाराने व वयाने वरिष्ठ असलेल्या व्यक्तिंनाही कर्तव्यमार्गाचा सहज

उपदेश करण्याची व तो त्या लोकांनी आदराने ऐकण्याची त्यांच्या बाबतीतील वस्तुस्थिती पाहिली म्हणजे त्यांच्या बाबतीत एक विशेष प्रकारची श्रध्दा, ते जे सांगतील ते अयोग्य असूच शकत नाही अशी जाणीव व ह्या सगळ्या गोष्टी कोणालाही सांगण्याचा त्यांना अधिकार आहे, अशी त्यांच्याविषयीची प्रगाढ निष्ठा सर्व समाजात उत्पन्न झाली होती असे दिसते. रामचंद्र कर्तव्याचा उपदेश आपल्या बंधूंना व सुहृदांना तर करताना दिसतात पण आपल्या पित्याला व मातेलाही करताना आढळतात. इतकेच काय पण इक्ष्वाकु वंशातील राजसिंहासनाची मान ज्यांच्यासमोर नेहमीच वाकली त्या सर्वश्रेष्ठ वसिष्ठ महर्षिनाही ते स्वकर्तव्याची जाणीव करून देताना दृष्टोत्पत्तीस येतात.

(१) ज्या वेळी राजा दशरथ पुत्रमोहात सापडून रामचंद्रांना वनात पाठवावयास एक दिवसाचा तरी विलंब लावावा असे म्हणू लागला व मला बंदीत ठेवून, 'तू राज्य करण्यानेच मला सुख व समाधान लाभेल, ' असे म्हणू लागला त्या वेळी त्याचे ते पुत्रमोहाने विकल झालेले हृदय पाहून रामचंद्रांनी ज्या पध्दतीने त्याची समजूत घातली व त्याला कर्तव्यमार्गाचे दिग्दर्शन केले त्यावरून पित्यावर त्यांचे केवढे नैतिक वजन असले पाहिजे हे स्पष्ट होते. एरवी दशरथ रामांना आज्ञा म्हणूनही अथवा नात्याच्या दृष्टीने अधिकाराने किंचित रागावूनही गप्प बसावयास लावू शकलो.

महर्षी या प्रकाराचे दिग्दर्शन करताना म्हणतात-

" हे राघवा ! कैकयीला दिलेल्या वरदानाने मी संभ्रमात झालो असल्यामुळे तू माझा निग्रह करून 'राजा' हो. " राजाचे म्हणणे ऐकताच धर्मनिष्ठ लोकात श्रेष्ठ असलेले रामचंद्र, हात जोडून आपल्या पित्याला म्हणाले की, " आपण सहस्त्र वर्षे पृथ्वीचे राज्य करा. मी अरण्यात राहीन. मला राज्याची आवश्यकता नाही. चौदा वर्षे अरण्यात राहून पूर्णपणे प्रतिज्ञापालन केल्यानंतर मी पुनश्च आपल्या चरणांना वंदन करीन. " रामांचे हे बोलणे ऐकताच सत्यपाशाने बांधलेला व कैकयीने प्रेरिलेला राजा रडत रडत रडत त्यांना म्हणाला, " तुझ्या यशात भर पडण्यासाठी व पुन्हा येथे परत येण्यासाठी म्हणून तू वनात जा. तुझ्यासारख्या सत्यसंध व धार्मिक व्यक्तिला त्याच्या निश्चयापासून ढळविणे मला शक्य नाही. पण मी तुला एकच विनंती करतो की निदान एक रात्र तरी तू माझ्यासाठी येथे राहा. एवढ्या एका रात्री मला तुझ्या सहवासातील आनंदाचे क्षण दाखीव. " आर्त पित्याचे हे भाषण ऐकताच रामाने त्यांना सांगितले, " आज या क्षणी जाण्यात मला जो लाभ होईल तो उद्या शक्य आहे काय ? सर्वथा मी या क्षणीच येथून जाणे अवश्य आहे. ही धनधान्ययुक्त अशी मी सोडलेली राज्यलक्ष्मी भरताला द्या. माझी वनवासाचा निश्चय केलेली बुध्दि आता कशानेही कंपित होणे शक्य नाही. "

इतकेच नव्हे तर त्यांनी पित्याला असेही सांगितले -

" पिता हे माझे दैवत आहे. ते माझेच काय पण देवतांचेही दैवत आहे व त्याच बुध्दिने मी पित्याच्या आज्ञेचे परिपालन करणार आहे. चौदा वर्षे हा हा म्हणता निघून जातील व पुनश्च आपण मला पाहाल. हा व्यर्थ संताप आपण सोडा. इतका क्षोभ चांगला नाही. शोकाकुल होऊन अश्रुमोचन करीत असलेल्या सर्व लोकांना सांभाळणे हे आपले काम आहे की स्वतःच रडत बसणे हे आपले काम आहे ? आपण शोक आवरा. "

(२) वनवासाच्या प्रसंगी सवतीकडून होणारी आपली दुर्दशा, पुत्राच्या ताटातुटीचे होणारे दुःख व स्वतःचा रामावरील अधिकार या तिन्ही गोष्टी सांगून कौशल्या ज्या वेळी विलाप करू लागली व त्या वेळी तिला शोक आवरावयास सांगून रामांनी जो उपदेश केला व आपले म्हणणे तिलाच अखेरीस ऐकावयास लाविले, यावरूनही त्यांच्या या प्रभावावर प्रकाश पडतो. ते मातेला म्हणतात -

" पत्नीने आपल्या पतीचा परित्याग करणे हे अत्यंत नृशंसपणाचे कृत्य आहे. तुझ्यासारख्या व्यक्तिच्या मनातही हा विचार येणे गर्ह्य आहे. जोवर माझे पृथ्वीपती वडील जिवंत आहेत तोवर तू त्यांची सेवा कर. हाच सनातन धर्म आहे. हा दारूण शोक माझ्या पित्याचा नाश करणार नाही अशा पध्दतीने तू त्यांच्या हिताला जप. जी स्त्री व्रतस्थ राहून दक्ष असते तिला श्रेष्ठ म्हणतात व आपल्या पतीचे अनुवर्तन न करणाऱ्या स्त्रीला पापी म्हणतात व त्याच्या शुश्रूषेनेच स्त्रीला उत्तम गती मिळते. मग तिने देवांची पूजा तर काय पण त्यांना नुसता नमस्कारही न केला तरी तिचे काही पावलेला आहे. "

(३) वसिष्ठ आपले वैयक्तिक वजन खर्च करून रामचंद्रांना वनवासाच्या निश्चयापासून निवृत्त होण्याचा उपदेश करीत असताना त्यांनी आपल्या गुरूला पुढीलप्रमाणे उत्तर दिले -

" आई व बाप मुलाच्या बाबतीत जे करतात त्याची फेड कोणालाही करता येणे शक्य नाही. जगाच्या बाजारात त्यांच्या प्रेमळ छायेखालीच सर्व प्रकारे त्याचे संवर्धन व विकास झालेला असतो. यथाशक्ती देऊन सर्व प्रकारे सांभाळून, उपजीवन चालवून व गोड बोलून ते मुलाला वाढवितात. ह्या सगळ्या गोष्टींचे स्मरण झाल्यानंतर माझ्या पित्याने मला केलेल्या आज्ञेला मी खोटे ठरविणे अशक्य आहे."

वसिष्ठांसारखा सिंहासनावर सतत अधिकार चालविणारा

महापुरुषदेखील त्यांच्या या म्हणण्यावर प्रत्युत्तर देऊ शकला नाही. या वरूनच रामाचे नैतिक वजन स्पष्ट होते. रामचंद्रांचे हे नैतिक वजन केवळ त्यांच्या परिवारावर व कुटुंबीय व्यक्तिंवरच होते असे नव्हे, तर जे जे त्यांच्या सहवासात येत ते स्वकीय असोत वा परकीय असोत, राम त्यांच्या समोर न नमता त्यांच्या व्यक्तिमत्त्वासमोर इतरांनाच नमावे लागले आहे, नेतृत्त्वाचे जन्मजात वैशिष्ट्य हे आहे की हजारो लोकांचे मत एका बाजूला असून त्या एकट्याचे मत मनापासून त्यांचा त्या गोष्टीला तीव्र विरोध असला तरी देखील मुकाट्याने त्यांच्या इच्छामनापासून त्यांचा त्या गोष्टीला तीव्र विरोध असला तरीदेखील मुकाट्याने त्यांच्या इच्छाशक्तिला त्या सर्वांना मान तुकवावी लागते. रामचंद्रांच्या बाबतीत तर हे अभिजात नेचृत्व इतके पूर्णतेला गेलेले दिसते की त्यांनी अंतिम निर्णय दिल्यानंतर अथवा आपली इच्छा व्यक्त केल्यानंतर तिच्या सर्वस्वी विरुध्द असणाऱ्या लोकांनाही वाणीने वा क्रियेने त्यांचेच अनुकरण करणे भाग पडले आहे. याची दोन तरी ठळक उदाहरणे रामायणात आहेत व तीही सामुदायिक स्वरूपाची आहेत.



## अभिजात नेत्तृत्व

(१) त्यातले पहिले उदाहरण बिभीषण शरणागतीच्या प्रकरणातले आहे. एका हनुमानाखेरीज करून बाकी सर्व लोकांनी शत्रूच्या या भावाला आश्रय देण्याच्या बाबतीत आपला तीव्र विरोध व्यक्त केला होता. रामचंद्रांनी त्या सर्वांच्या कल्पनेला धक्का देत आपला स्वतःचा निर्णय असा सांगितला की -

" जो एकदम शरण येऊन मी आपला आहे व मला वाचवा असे म्हणेल तो कोणीही असला तरी त्याला अभयप्रदान करणे हे माझे व्रत आहे, हे हरिश्रेष्ठा ! मी याला अभय दिले आहे, तू स्वतः त्याला घेऊन ये. बिभीषणच काय; प्रत्यक्ष रावण जरी माझ्यासमोर आला तरी मी त्याला अभयप्रदान केल्यावाचून राहणार नाही. "

वस्तुतः सुग्रीवाच्या सैन्याच्या भरवशावर लंकेच्या स्वारीची सिध्दता असल्यावर त्याच्या म्हणण्याला सगळ्यात अधिक किंमत होती; पण रामचंद्रांच्या या बोलण्यावर कोणाचीही काही एक बोलण्याची हिम्मत होईना. त्यानंतर मुकाट्याने सर्व लोक त्याच्या म्हणण्यास कबूल झाले.

(२) दुसरे उदाहरण तर यापेक्षाही विलक्षण आहे. बिभिषणाच्या बाबतीतील निर्णयात रामाच्या हृदयाची श्रीमंती तरी व्यक्त झाली होती; पण ह्या दुसऱ्या उदाहरणात क्षुद्रता व क्रौर्य हेच कठोर भाव व्यक्त होऊन राम सर्वांच्या रागाला, दुःखाला व क्षोभालाच कारणीभूत झाले होते. त्यांच्याविरुध्द ' ब्र ' मात्र कोणीही काढू शकला नाही. राक्षसराष्ट्राच्या विनाशानंतर ज्या सीतेसाठी डोळ्यातल्या अश्रूंनी रामचंद्रांनी दण्डकारण्यातला प्रत्येक रजःकण ओलाचिंब केला, आपल्या करूण विलापाने स्थावरांनाही पाझर फोडला व विरहगीतांचे अमर स्फूर्तिलेख दण्डकारण्याच्या झाडादगडांवर कोरून ठेविले, ते राम समोर उभ्या राहिलेल्या सीतेला लोकांच्या कल्पनेतही येऊ शकणार नाही असा आपला निर्णय ऐकवू लागले. ते म्हणाले -

" शत्रूने केलेल्या संघर्षाचा ज्या पध्दतीने प्रतिकार करणे अवश्य आहे, त्या पध्दतीने मी तो केलेला आहे. अगस्तीने दक्षिण दिशा जिंकावी त्याप्रमाणे मी तुला जिंकले आहे; पण मी जो हा संग्राम केला व मी मित्रांच्या मदतीने विजय संपादिला. तो तुझ्यासाठी केलेला नाही. माझे स्वतःचे चारित्र्य राखावे व वंशाला लागलेला कलंक धुवून निघावा म्हणूनच मी हे केले आहे. तुझ्या चारित्र्याविषयी मला संशय उत्पन्न झालेला असल्यामुळे मंद नेत्रशक्तीच्या व्यक्तीला जशी दीपशिखा त्याप्रमाणे तू मला भासत आहेस. मला तुझी काही गरज नाही. तुला दहाही दिशा मोकळ्या आहेत. तुला वाटेल तिकडे तू जा. कोणचा असा कुलीन व तेजस्वी पुरुष आहे की जो लोभाविष्ट होऊन दुसऱ्याच्या घरी राहिलेल्या स्त्रीचा पुन्हा [illegible] करील ? त्याने आपली पापी नजर तुझ्यावर खिळविली होती. त्याच्या अंकाचा तुला स्पर्श झालेला आहे. अशा स्थितीत महान कुळाचे नांव सांगणारा मी तुझा स्वीकार कसा करू शकेल ? ज्याच्यासाठी म्हणून मी तुला रावणापासून जिंकले तो भाग आता समाप्त झालेला आहे. मला तुझी यत्किंचितही अभिलाषा नाही. तुला वाटेल त्या व्यक्तिच्या ठिकाणी तू आपले मन जुळवू शकतेस. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न, सुग्रीव, बिभिषण, अथवा इतर कोणीही तू पाहा व जेथे तुला सुख लागेल तेथे खुशाल राहा. तुझ्यासारख्या दिव्य व मनोहर सौंदर्य लाभलेल्या व तेही सर्वस्वी आपल्या बंदीखान्यात असलेल्या स्थितीत रावण संयम राखू शकेल हे केवळ असंभवनीय आहे. "

रामांच्या या विषारी वाग्बाणांचा प्रहार सीतेचेच नव्हे तर जमलेल्या सगळ्याच लोकांची अंतःकरणे भेदून गेला. त्या सतीवर हा अन्याय होत आहे व तो विनाकारण असून त्याला मुळीच संमती देऊ नये असे प्रत्येकाला वाटत होते. किंबहूना प्रत्येकाचा त्या गोष्टीला मनापासून तीव्र विरोध होता. हा अन्याय आहे व तुम्ही तो करण्याचे कारण नाही असे कोणीही बोलू शकला नाही. इतकेच नव्हे, तर मनातल्या सर्व भावना संतापाने व दुःखाने क्षुब्ध होऊन गेल्या असताही लक्ष्मणाने चिता तयार केली व मन आणि नेत्र ते दृश्य सहन करावयास मुळीच सिध्द नसतानादेखील लोकांनी सीतेच्या अग्निप्रवेशाचा करुण व भयानक देखावा प्रत्यक्ष पाहिला. वाल्मिकी महर्षि म्हणतात -

" त्या वेळी एखाद्या अंतकाप्रमाणे भयंकर दिसणाऱ्या रामचंद्रांचा अनुनय करणे व त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलणे तर लांबच राहिले, पण त्यांच्याकडे कोणीही प्रत्यक्ष पाहूदेखील शकेना. " ह्याचा अर्थ काय ? रामाच्या अभिजात व्यक्तिमत्वाचा प्रभावच इतका जबरदस्त होता की इच्छा असो वा नसो मुकाट्याने त्यांच्या म्हणण्याला वा वागण्याला लोक अनुमोदन देत. इतके प्रभावी व्यक्तिमत्व कसे उत्पन्न झाले ? सर्वसामान्यतः राम हे देव होते, त्यामुळे हे सर्व काही शक्य आहे, असेच त्याचे उत्तर कोणीही सश्रध्द मनुष्य देईल व वाल्मीकीय रामायणात राम हे महाविष्णूचा अवतार होते असे प्रत्यक्ष महर्षि वाल्मीकीनीच अनेकवार दर्शविले आहे. पण जे राम आपल्या काव्याचे अधिनायक म्हणून महर्षि वाल्मीकींना वर्णन करावयाचे आहेत ते मात्र देव या नात्याने वर्णन करावयाचे नसून टाकीचे घाव सोसून देवपण मिळविलेले रामच वर्ण करावयाचे आहेत असे स्पष्ट दिसते. आधी रामचंद्रांच्या ज्या राक्षसराष्ट्राच्या विध्वंसाच्या महत्कृत्यामुळे राम हे महाकाव्याचा विषय झाले आहेत तो विध्वंसच देवाकडून होऊ शकत नाही. उलट तो मानवाकडूनच झाला पाहिजे अशी अट आहे. महर्षि वाल्मीकी लिहितात :

" म्हणून देवतांनी विष्णूला सांगितले की, रावणाचा वध मनुष्याच्याच हातून होईल. विष्णूने मनुष्य व्हावयाचे ठरविले व राजा दशरथालाच आपला पिता म्हणून निवडले. " ही मानवी अवस्था जर अजिबात सोडली तर रावणवधाचे कृत्य अशक्य होते. म्हणून या देवाने मानवतेचा सर्वस्वी अंगीकार केलेला आहे. तो इतका की, त्याच्या देवत्वाचा त्याला पूर्णपणे विसर पडलेला आहे. दुसऱ्या कोणाच्या ऐवजी प्रत्यक्ष रामाचीच या बाबतीतली कबुली मी आपणास दाखवितो. रावणवधानंतर देवतांनी ह्या देवाला तू देव आहेस असे सांगण्याचा प्रयत्न केल्यावर त्याने असे उत्तर दिले आहे की :

" माझी अशी समजूत आहे की मी मनूष्य असून दशरथाचा मुलगा आहे व माझे नाव राम आहे. "

रामचंद्रांच्या चरित्राचे जर दोन भाग केले तर असे दिसून येईल की, युध्दकांडापर्यंत त्यांचे चरित्र हे ' देवत्व ' व 'मानवता' यांनी मंत्रित असून उत्तरकांडातील त्यांचे चरित्र केवळ देवत्वाचा अविष्कार आहे. म्हणून युध्दकांडापर्यंतचे महर्षि वाल्मीकींचे राम हे मानव असून टाकीचे घाव पण सोशीत व महान आत्मयज्ञ करीतच त्यांनी देवपणा प्राप्त करून घेतलेला आहे. महर्षींच्या हे चित्र रंगविण्याच्या कौशल्याची कल्पना येण्याइतकी पुष्कळांच्या हृदयाची उंची नाही. त्यामुळे अकारण कित्येक टीकाकारांनी आपले पांडित्य मिरवून महर्षींच्या द्राक्षापाकाच्या प्रसन्न रचनेच्या काव्यात शब्दांची ओढाताण करीत बसण्याचा व्यर्थ खटाटोप केलेला आहे व कित्येक स्वतंत्र्य ग्रंथकारांनी रामाच 'देवत्व' सिध्द करण्याच्या खटाटोपात पडून मूळच्या रामकथेचे हृदयस्पर्शी, रमणीय चित्र विकृत केलेले आहे. उद्या जर कोणी सीता रावणाने पळविली नसून ती खोटीच सीता होती व रावण हा मोक्ष मिळविण्यासाठी सामाच्या हातून मरणाचीच इच्छा करीत होता, असे सांगितले तर त्या कल्पित सोंगात कोणाचे चित्त रमेल ? वस्तुतः इतक्या उपद्व्यापाची काही आवश्यकताच नाही. महर्षि वाल्मीकींची प्रतिभा इतकी दीर्घदर्शी आहे व साऱ्याच व्यक्तिचित्रांचे तिने केलेले आविष्करण इतके सुसूक्ष्म व परिपूर्ण आहे की कोणी ते सद्बुध्दीने सुधारण्याचा उपद्व्याप केला तरी देखील त्याचे मूळचे सौंदर्य बिघडते. रामाच्या मानवतेची वाल्मीकींची व्यक्तिकरणे अत्यंत हृद्य आहेत. राम देव होते व ते परिपूर्ण होते याचा अर्थ त्यांना भावना नव्हत्या, वैयक्तिक हानीने ते दुःखी व लाभाच्या कल्पनेने ते हर्षित होत नव्हते, त्यांना विनोद करता येत नव्हता, निरुपद्रवी व आवश्यक असल्याचा त्यांनी कधी अंगीकारच केला नाही, असा पुष्कळ लोक करतात : पण तो खोटा आहे. अत्यंत श्रेष्ठ अशी भावनाशून्य साक्षीची अवस्था श्रीकृष्णांची आहे म्हणूनच श्रीकृष्णांना पूर्णावतार म्हणतात व रामचंद्रांना मर्यादापुरुषोत्तम म्हणतात. रामचंद्रांच्या व्यक्तित्वातील मानवतेच्या आविष्काराची प्रत्यक्ष उदाहरणेच मी आपल्याला देतो. म्हणजे माझे म्हणणे अधिक स्पष्ट होईल.

## रामांची मानवता

मनुष्याचा हा स्वभाव आहे की आपल्या व्यक्तिगत अभ्युदयाच्या कल्पनेने त्याने हर्षित व्हावे व पुढे कोणते ताट वाढून ठेविले आहे याची कल्पना नसल्यामुळे तो आपला हर्ष त्याने आपल्या अत्यंत प्रिय व्यक्तिजवळ व्यक्त करावा, अशी प्रिय व्यक्ती पत्नीवाचून दुसरी कोणती असू शकेल ? रामचंद्रांच्याही बाबतीत हे घडून आलेले आहे. ज्यावेळी

कैकयीच्या महालातून सुमंत्र, राजा दशरथाच्या बोलावण्याचा संदेश घेऊन रामचंद्रांकडे आला, त्यावेळी पुढच्या दुःखद प्रसंगाची कल्पना नसल्यामुळे एखाद्या सामान्य माणसाप्रमाणेच उद्या आपण निश्चित 'युवराज ' होणार या कल्पनेने आनंदित झालेले राम, सीतेला म्हणत आहेत :

" हे देवी, महाराज व देवी कैकयी माझ्या यौवराजाच्या अभिषेकासंबंधीचा काही खास विचार करीत आहेत हे निश्चित. अत्यंत उदार हृदयाची व माझे प्रिय व्हावे अशीच जिची सदैव इच्छा आहे, ती देवी कैकेयी माझे काही खास प्रिय करण्याविषयी महाराजांना प्रेरणा करीत आहे असे स्पष्ट दिसते. माझ्या अभिषेकाची बातमी ऐकून ती अत्यंत आनंदित झाली असेल व म्हणूनच माझे प्रिय करण्याची तिची इच्छाही बळावल असेल. आपल्या अत्यंत प्रिय राणीबरोबर महाराज काही खास गोष्टी बोलत असावेत. जशी तेथे बैठक महत्त्वाची आहे तदनुरूपच येथे दुतही महत्त्वाचाच पाठविण्यात आलेला आहे. यावरून मला असे वाटते की महाराजांना घाई होऊन ते मला आताच यौवराज्यावर बसविणार. मी आता लौकरच राजमहालात जातो व महाराजांचे दर्शन घेतो. तोवर तू आपल्या परिवारासहित आंनदाने आपले मनोविनोदन करीत येथेच रहा. "



## रामांच्या दुःखाचे आविष्कार

रामचंद्रांनाही सामान्य मनुष्याप्रमाणेच आपल्या लाभालाभाने दुःख होत असे व प्रसंगी ते आवरावे लागत असे, असे दिसते. वनवासात जाण्याची आज्ञा झाल्यावर माता कौसल्येला ती बातमी सांगण्याची पाळी ज्यावेळी प्रथमच रामचंद्रांवर आली त्यावेळी त्यांना असे दुःख झाल्याचे व त्यांनी ते आवरल्याचे रामायणातच वर्णन आहे :

" आपल्या अंतःकरणातले दुःख आवरून व इंद्रियव्यापारही संभ्रमित न होऊ देता रामांनी आपल्या आईला अप्रिय वार्ता सांगण्यासाठी तिच्या महालात प्रवेश केला. " राम दुःख जरी आवरत असले तरी क्वचित प्रसंगी अत्यंत प्रिय व्यक्तीच्या समोर त्यांनाही आपले दुःख आवरणे अगदी कठीण होत असे व ते त्यांच्या सर्व हालचालीतून व मुखावरील भावविकारावरूनही व्याक्त होत असे, असे दिसते.

वनवासाची बातमी प्रथमच सीतेला सांगण्याच्या वेळी रामाची अशीच शोकाकुल अवस्था झाल्याचे वर्णन आहे :

" राम आपल्या शोभिवंत महालात शिरले. त्यावेळी त्यांचा चेहरा लज्जेने किंचित म्लान झालेला असून त्यांनी मान खाली घातली होती. सीतेने त्यांना पाहताच चिंतेने त्यांची हालचाल व्याकुल दिसू लागल्यामुळे तीही व्याकूळ झाली. रामांनी सीतेला पाहताच ते आपले दुःख आवरू शकले नाहीत. त्यांच्या कपाळावर घर्मबिंदू उमटले व चेहरा निस्तेज दिसू लागल. त्यामुळे व्याकुळलेल्या सीतेने त्यांना असे विचारले की, महाराज हे काय ? "

आपल्या अंतःकरणातले विचार एखाद्या सामान्य मनुष्याप्रमाणे रामही व्यक्त करीत व ते अगदी सामान्य प्रतीचे असत असे दिसते. उदाहरणार्थ, वनवासाच्या पहिल्या रात्री राम लक्ष्मणाला म्हणतात :

" आज कैकेयी तिची इच्छा पूर्ण झाल्यामुळे आनंदित झाली असेल. भरत आल्यावर राज्यलोभाने दशरथ महाराजांना ती ठार तर मारून टाकणार नाही ? आज खरोखरी जगात जर कोणी सुखी असेल तर तो कैकेयीपुत्र भरतच होय. कारण तो सपत्नीक एकटा मोठ्या आनंदाने या संपूर्ण कोसल देशाचे राज्य करील. वडील वृध्द झाले आहेत व मी अरण्यात आलो आहे, अशा स्थितीत राज्याच्या सुखाचा सर्वश्रेष्ठ वाटेकरी एकट्या भरतावाचून दुसरा कोण आहे ? कैकेयी अत्यंत क्षुद्र बुध्दीची असल्यामुळे द्वेष भावनेने अंध होऊन न्याय-अन्यायाचा ती मुळीच विचार करणार नाही. कदाचित् सवतीमत्सराने प्रेरित होऊन ती माझ्या आईला विष तर देणार नाही ? " याप्रमाणे रामचंद्रांनी त्या अरण्यात पुष्कळ विलाप केला व अश्रूंनी डोळ्यांत गर्दी केलेल्या स्थितीत त्यांनी ती रात्र अतिशय दुःखात घालविली.

रामचंद्रांच्या उत्कट व अमर शोकगीतांनी व त्यांच्या व्याकुळतेने अरण्यकांडाच्या ६१ ते ६६ या सर्गात जे स्वरूप धारण केले आहे, ते तर सर्वांच्याच परिचयाचे आहे.

## मोह व विकारवशता

श्रीरामचंद्रांना मनुष्यस्वभावसुलभ असा मोह उत्पन्न झाल्याचे वाल्मीकी रामायणात वर्णन आहे. मारीच-प्रकरण (वाल्मीकी रामायण, अरण्यकांड, अध्याय ४३) हे त्याचे प्रत्यक्ष उदाहरण होय. क्वचित मोहामुळे ते संतापाच्या आहारी गेल्याचेही दिसते. अखेरीस लक्ष्मणाला त्यांना आवरण्याचे प्रसंग

आलेले आहेत. सीतेच्या शोकाने संतप्त झालेले राम संपूर्ण त्रैलोक्यालाच जाळून टाकावयास निघाले होते व लक्ष्मणाने त्यांची समजूत घातली असे अरण्यकांडात वर्णन आहे :

" जर माझ्या सीतेचा या त्रैलोक्यातील कोणीही पत्ता सांगणार नसेल तर मी हे देव, गंधर्व, मनुष्य व सर्प ह्यांच्यासहित सर्व जगत् नष्ट करीन. आजपर्यंत इतके कधीही न संतापलेल्या रामचंद्रांचा तो अभूतपूर्व रुद्रावतार पाहून काळजीने लक्ष्मणाचा कंठ सुकला व त्याने हात जोडून त्यांना असे म्हटले की पूर्वी आपण अत्यंत मृदु प्रकृतीचे असून सर्व प्राणिमात्रांच्या हितासाठी जपणारे होता. ही आपली मूळची प्रकृती क्रोधवश होऊन आपण सोडू नये. एकाच्या अपराधासाठी आपण त्रैलोक्य भस्मसात करू नये. " यानंतर असेच दुसरे उदाहरण किष्किंधाकाण्डात घडलेले आहे. सुग्रीवाने सीतेच्या शोधाची सर्व तयारी चिलविलेली असूनही तिची केवळ माहिती नसल्यामुळे सीतावियोगाने कर्षित झालेले प्रभु रामचंद्र अतिशय संतापले. त्या भरात पुढची अतिशय भीषण वाक्ये त्यांच्या तोंडून बाहेर पडली.

" लक्ष्मणा, सुग्रीवाकडे जाऊन माझ्या क्रोधाची त्याला यथार्थ कल्पना दे. त्याला असे सांग की नीट मार्गात रहा. ज्या रस्त्याने वाली गेला तो रस्ता संकुचित झालेला नाही. त्या रस्त्याने तू जाऊ नये अशी माझी इच्छा आहे. मी वालीला एकट्यालाच ठार मारले; पण तुला मात्र कृतघ्नतेच्या अपराधासाठी मी सुपुत्रपौत्रबांधव यासह ठार मारीन. " या वेळी रामांनी स्वतःचा राग स्वतःच आवरलेला आहे. यानंतर या प्रसंगाचे तिसरे उदाहरण उत्तरकांडात आलेले आहे. सीतेने विवरप्रवेश केल्यानंतर रामचंद्रांची काय अवस्था झाली याचे शब्दचित्र महर्षि वाल्मीकी पुढीलप्रमाणे रेखाटतात -

" आपल्या हातातील दंडकाष्ठ घेऊन रामचंद्र अश्रुमोचन करू लागले. त्यांनी दुःखाने मान खाली घातली होती. त्यांचे दैन्य व दुःख त्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून येत होते. पुष्कळ वेळपर्यंत विलाप करीत अश्रुमोचन केल्यानंतर ते संतापाने पृथ्वीला म्हणाले, मी मैथिलीच्या शोकाने उन्मत्त झालो आहे. तू माझी सीता मुकाट्याने मला परत दे. जर न देशील तर मी पर्वतवनासहित माझ्या दिव्य सामर्थ्याने तुझा सर्वनाश करीन. मग सगळे जलमय झाले तरी हरकत नाही. " नंतर ब्रम्हदेवाने त्यांची समजूत घातली व त्यांनी आपला क्रोध आवरला.

## आदर्श पुत्र

पित्यासाठी रामचंद्रांनी पुत्रत्वाचा कोणता दिव्य आदर्श उत्पन्न केला हे रामायण कथेच्या वाचकाला सांगावयास नकोच. ते स्वतःच एके ठिकाणी या संबंधाने कृतार्थतेचे उद्‌गार काढताना म्हणतात -

माझ्यासारखा पुत्र मागे झाला नाही व पुढे होणार नाही. भावनेच्या पाण्याने पुत्रकर्तव्याचा रामचंद्रांच्या अंतःकरणातील बंध शिथिल करण्यासाठी भरत चित्रकूटावर आपल्या नेत्रातून अश्रूंचा पूर वाहवीत असताना रामांनी त्याला दिलेले अखेरचे उत्तर त्यांच्या जीवनपटातील या विशिष्ट बाजूवर झगझगीत प्रकाश टाकते. ते म्हणतात -

" लक्ष्मी चंद्राला सोडून जाईल अथवा हिमाचल आपली शीतलता सोडील, समुद्र मर्यादेचे उल्लंघन करील, पण मी माझ्या पित्याची प्रतिज्ञा कधीही भंग पावू देणार नाही. " किंबहुना कर्तव्यमार्गाचा भरताला उपदेश करीत असताना राम उलटे भरतालाच असे म्हणतात,

" केवळ पित्याची आज्ञा पाळण्यासाठी लक्ष्मण व सीता यांच्यासह मी या निर्जन वनात आलो आहे. आपल्या पित्याची आज्ञा पाळणे हे तुझेही कर्तव्यच नाही काय ? पिता सत्यवादी व्हावा यासाठी माझ्याकडे सोपविलेल्या त्याच्या एका आज्ञेचे मी परिपालन केले तसेच तूही त्याच्या दुसऱ्या आज्ञेचे परिपालन केले पाहिजेस. सत्यवादी पित्याने तुला राज्याभिषेक करून घेण्याची आज्ञा दिलेली आहे. पिता सत्यवादी ठरावा म्हणून ताबडतोब राजसिंहासनाचा अंगीकार करणे हेच तुझे कर्तव्य आहे. नरकापासून जो बापाला वाचवितो व सर्व प्रकारे अधःपतनापासून त्याचे संरक्षण करतो, त्यालाच पुत्र असे म्हणतात. पुष्कळ गुणवान पुत्र उत्पन्न करावेत म्हणजे निदान त्यातला अेक तरी गयेला जाऊन पित्याला सद्‌गती देईल व आपले पुत्रकर्तव्य बजावील असे सर्व राजर्षि म्हणतात. इतर कोणाकरिता नाही तरी निदान माझ्याकरिता तू आपल्या पित्याला अधःपतनापासून वाचव व त्यासाठी तरी राज्याचा स्वीकार कर. "

भरताने त्यांना मी वनवास करतो व आपण राज्य करा म्हणून विनिमयाने पित्याच्या आज्ञेचे परिपालन होईल, असे सुचविल्यावर रामचंद्रांनी जे धीरोदात्त उत्तर दिले आहे ते त्यांच्या पिताज्ञा-परिपालनाच्या कल्पना किती नाजुक व उदात्त होत्या, हे दर्शविते. ते म्हणतात, 'उपाधिर्न मया कार्यो वनवासे जुगुप्सितः ' विनिमयाची कल्पना त्यांच्या अभिजात चारित्र्याला अत्यंत अपमानास्पद वाटते. त्याला जी आज्ञा दिलेली आहे त्याच आज्ञेचे त्याने परिपालन केले पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत आहे. रामचंद्रांच्या हृदयातल्या पित्याविषयीच्या खऱ्या उत्कट भावना अयोध्याकांडाच्या अठराव्या सर्गात उचंबळून आलेल्या आहेत. कारण तेथे त्यांच्या भावनांना डिवचण्यात आलेले आहे.

सुमंत्र्याच्या बोलवण्यावरून राम, पुढे काय वाढून ठेवले आहे याची काही एक कल्पना नसताना, कैकेयीच्या महालात राजा दशरथाची भेट घ्यावयास येतात. त्या वेळी राजाची विकलावस्था पाहून दुःखी अंतःकरणाने कैकेयीला ' काय प्रकार आहे ' म्हणून राम विचारतात. कैकेयी त्यांना असे उत्तर देते की -

" राजा शुभ बोलो, किंवा अशुभ बोलो, ते जसेचे तसे आचरावयाची खात्री तू मला देत असशील तर त्याचे काय हृद्गत आहे ते मी तुला सांगते. " असा संशयदेखील तिने आपल्याविषयी का घ्यावा याचेच रामांना मरणप्राय दुःख होते व भावनेच्या आवेगाने ते सांगतात -



" हे देवी, माझ्याविषयी असा संशय यावा काय ? धिक्कार असो ! हे शब्दही माझ्याविषयी उच्चारणे त्याला शोभणार नाही. राजाच्या शब्दासाठी मी जळत्या अग्नीकुंडात उडी घेईन, तीक्ष्ण विष भक्षण करीन, समुद्रात उडी घेईन, कोणत्याही भयानक आपत्तीत राजाचा शब्द राखला जावा म्हणून मी माझी मान द्यावयास सिध्द आहे. कारण राजा, गुरू, पिता या सर्वच दृष्टींनी वडील मला सर्वस्वी मान्य आहेत. जे राजाचे अभिलाषित असेल ते तू मला निःशकपणे सांग. मी तुला प्रतिज्ञेवर सांगतो की ते कितीही दुष्कर असेल तर मी करीन. राम दोनदा बोलत नसतो. " 'रामोद्विर्नाभिभाषते ! ' केवढा भव्य हा आत्मप्रत्यय !

यौवराज्याभिषेकाच्या कल्पनांचित्राचीच रामांना वस्तुतः या क्षणापर्यंत ओळख होती. पण कैकेयीने ती दारुण वनवासाची कल्पना सांगितल्यावरही त्यांच्या त्या दृढनिश्चयीपणात काहीही फरक पडला नाही. महर्षि वाल्मीकी म्हणतात -

मरणासारखे तीव्र दुःख देणारे ते कैकेयीचे वचन ऐकूनही शत्रूंजय राम किंचितही व्यथित न होता तिला म्हणाले, " ठीक आहे. राजाची प्रतिज्ञा पार पाडण्यासाठी मी जटा व वल्कले धारण करून अरण्यात जावयास निघतो. कल्याणेच्छू, गुरु, पिता, राजा ही सर्वच श्रेष्ठ नाती ज्यांच्या ठिकाणी एकवटली आहेत त्यांनी विश्वासाने या कार्यात माझी नियुक्ती केली असल्यावर मी त्यांचे प्रिय करणार नाही काय ? " माता कौसल्येला तर त्यांनी या बाबतीतली आपली निष्ठा स्पष्टच सांगितलेली आहे. मातेच्या विलापाने दुभंगलेले आपले हृदय सावरीत ते म्हणतात -

" पित्याच्या वचनाचे अतिक्रमण करण्याची माझ्यात शक्ती नाही. मी तुझ्या चरणांवर मस्तक ठेवतो. वनात जाण्याची माझी इच्छा आहे. धर्मशास्त्रात निष्णात असलेल्या कण्डू नावाच्या एका वनवासी ऋषीने पित्याच्या आज्ञेवरून गोवध केला. आपल्या याच कुळात सागराच्या आज्ञेवरून भूमी खणून काढताना सागरपुत्रांनी भयानक संहाराच्या अग्निकुंडात स्वतःला झोकून दिले. जामदग्न्य रामाने केवळ पित्याच्या आज्ञेसाठी प्रत्यक्ष आपल्या रेणुका मातेच्या कंठआवरून लोकांनाही धैर्याने पित्याच्या आज्ञेने परिपालन केलेले आहे. मीही तेच करणार आहे. मी एकटाच हे करीत आहे असे नसून ज्यांची नावे मी तुला सांगितली त्या सर्वांनी हेच केले आहे. केवळ तुला दुःख द्यावे म्हणून मी हा नवा धर्म शोधून काढला आहे, असे तुला वाटते का ? पूर्वीच्या लोकांनी आचरिलेल्याच मार्गाने मी जात आहे. हे माझे कर्तव्य असल्यामुळे मी तेच करणार. पित्याच्या वचनाचे यथावत् परिपालन करणाऱ्याचे अधःपतन कधीच होत नाही. "

ज्या सत्यसंध पित्यासाठी रामांनी आपली ही निष्ठा जागजागी व्यक्त केलेली आहे, त्या पित्याला त्यांच्या या निष्ठेची पूर्णपणे कल्पना होती. इतकेच नव्हे तर तो त्यामुळेच अत्यंत दुःखी होता. कैकेयीला राजा दशरथ म्हणतो -

" माझ्या शब्दांवर राम एक अक्षरदेखील बोलणार नाही अशी माझी खात्री आहे. मी ' वनात जा ' असे म्हटल्याबरोबर ' होय ' असेच तो म्हणेल. मी वनात जावयास सांगतल्यावर राम जर माझे न ऐकता प्रतिकूल वर्तन करील तर माझे अत्यंत प्रिय होईल, पण तो तसे करणार नाही (हीच अत्यंत दुखाःची गोष्ट आहे )." राजाचा हा विश्वास किती यथार्थ होता ! सर्व विश्वाच्या नियमनाची प्रचंड शक्ती असूनही एखाद्या तृणाप्रमाणे राज्यलक्ष्मीला लाथाडून रामांनी वनवासाचा मार्ग पत्करला. पित्याच्या वचनासाठी पुत्राने आपल्या महान जीवनाचा नंदादीप स्वयंप्रेरणेने तिळतिळ जाळला. केवढा हा पुत्रधर्माचा उदात्त आदर्श !

## आदर्श बंधू

लक्ष्मण व शत्रुघ्न हे बंधुत्वाचे सर्वश्रेष्ठ आदर्श आहेत. भरताचा त्याग गोस्वामी तुलसीदासांच्या प्रतिभेला तर

श्रीरामांपेक्षाही अधिक पूजार्ह वाटला आहे. तरीही रामचंद्रांच्या चरित्राचा जो जो विचार करू लागावे, तो तो याही बाबतीत " तेषां केतुरिव ज्येष्ठो रामः सत्यपराक्रमः " हा महर्षि वाल्मीकींचा अभिप्रायच मनावर ठसू लागतो. " तुझ्याऐवजी भरताला हे राज्य द्यावे, " असे राजाच्या मनात आले. हे कैकेयीने म्हणताच रामचंद्र म्हणतात -

" भरताला हे राज्य देण्यासाठी स्वतः महाराजांनी मला आज्ञा करण्याचे काहीच कारण नाही. भरताला माझ्या अधिकारक्षेत्रातली जी वस्तू हवी असेल ती मी त्याच्या ताब्यात देईन. मला नुसते कळण्याचाच अवकाश आहे. राज्य, सीता फारतर काय पण माझे प्राणही मी भरताच्या सहज स्वाधीन करीन. " राज्यासाठी भरताला ठार मारण्याची इच्छा बोलून दाखविणाऱ्या लक्ष्मणाला रामचंद्रांनी जे उत्तर दिले आहे, त्यात त्यांच्या बंधुवात्सल्याचे संपूर्ण प्रतिबिंब उमटले आहे. ते म्हणतात -

" मित्र वा बांधव यांचा नाश करून जी संपत्ती मिळणार असेल ती मी कधीच घेणार नाही. विषमिश्रीत अन्नाप्रमाणे ती सर्वस्वी त्याज्य आहे. लक्ष्मणा ! धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थाची माझी साधना अथवा पृथ्वीदेखील मला केवळ तुमच्याचसाठी हवी आहे हे मी तुला प्रतिज्ञेवर सांगतो. मी शस्त्रावर हात ठेवून तुला सत्य सांगतो की बंधूमध्ये सदैव एकता नांदावी व तुम्ही सुखी असावे एवढ्याचसाठी केवळ मी राज्याची इच्छा करीन. आपत्तीत पुत्रांनी पित्याला मारावे अथवा आपत्ती आली म्हणून आपल्या प्राणांसारख्या प्रिय बंधूवर कोणी प्राणघातक वार करावा काय ? " बंधुवत्सल रामचंद्रांनी या बाबतीत एक उदाहरण इतके अपूर्व घालून दिलेले आहे की, ते वाचून मन आश्चर्याने स्तिमित होऊन जाते. चित्रकूटावरील भेटीत भरताला वस्तुस्थितीचे दिग्दर्शन करताना ते सांगतात -

" पूर्वीच तुझ्या आईशी विवाहबध्द होत असताना आपल्या पित्याने तुझ्या आजोबांना तुझ्या आईची संतती हीच राज्याची उत्तराधिकारी होईल, " असे वचन दिले आहे. वस्तुतः ही वचनाची गोष्ट स्वतः राजा दशरथ व कौसल्या यांच्यावाचून कोणालाही माहीत असल्याचे रामायणावरून दिसत नाही. पट्टराणी कौसल्येला राजाच्या या वचनाची कल्पना असल्यामुळेच ती पुत्रवत्सल माता आपल्या पुत्राच्या राज्याभिषेकात व्यत्यय न यावा म्हणून धार्मिक विधिविधान व पूजा यांचे देवाला साकडे घालण्याचा मार्ग पत्करते, असे महर्षि वाल्मीकींनी सुचविले आहे.

" पुत्राचे हित व्हावे म्हणून कौसल्या रात्रभर ध्यानस्थ राहिली व सकाळी तिने महाविष्णूंची पूजा केली. " राजधर्माप्रमाणे ज्येष्ठपुत्र या नात्याने रामच राज्याचा उत्तराधिकारी आहे ही गोष्ट निर्विवाद स्पष्ट असताना पुत्राच्या हितात असा कोणता बिघाड व्हावयाचा कौसल्येला संभव दिसत होता की, ज्याच्यासाठी तिला देवताराधनाची आवश्यकता वाटावी ? हे कराराचे प्रकरण तिला माहीत असावे हेच यावरून स्पष्ट होते. राजा दशरथ तर कराराचे हे पिशाच्च ऐनवेळी विघ्न करावयास पुढे येऊ नये म्हणून शक्य ती खटपट करीत असतो व अशा विघ्नाची भीती त्याच्या मनात सदैव वावरत असल्याचे स्पष्ट दिसते. राज्याभिषेकाच्या आदल्या रात्री मुद्दाम रामांना बोलावून दशरथ म्हणतो -

" रामा ! मला अलीकडे अशुभ स्वप्ने पडतात. आकाशातून आवाज करीत उल्का पडताना दिसतात. ज्योतिषी असे सांगतात की, सूर्य, मंगळ व राहू या दारूण ग्रहांनी माझे जन्मनक्षत्र वेष्टिलेले आहे. प्राण्यांची बुध्दी चंचल असते. म्हणून जोवर माझे चित्त विचलित झाले नाही तोवर तू स्वतःला अभिषेक करून घे. " वचनाच्या बलिवेदिवर पुत्रवियोगाच्या अग्निकुंडात ज्याने आपल्या जीवनाचीच समिधा जाळून भस्म केली त्या सत्यसंध दशरथाला कोणते अज्ञात भय विचलित करीत आहे ? तो पुढे म्हणतो -

" सुहृदांनी सावध राहून आज चोहोबाजूंनी तुझे संरक्षण करावे. कारण अशा प्रकारच्या कार्यात पुष्कळच विघ्ने उत्पन्न होत असतात. जोवर भरत अयोध्येपासून दूर आहे तोवरच तुला राज्याभिषेक होणे इष्ट आहे, असे मला वाटते. भरत ज्येष्ठानुवर्ती, धर्मात्मा, चारित्र्यवान, जितेन्द्रिय व धर्मात्मा असून त्याचे आचरण सत्पुरुषाप्रमाणेच आहे हे खरे, पण मनुष्याचे चित्त चंचल असते असे मला वाटते. " असे कोणते संकट रामावर येण्याची दशरथाला भीती वाटते की ज्यासाठी सहृदांनी त्याचे खास संरक्षण करावे ? भरताचेच तेथे असणे त्याला अनिष्ट का वाटावे व लक्ष्मणाचे का वाटू नये ? दोघेही तर रामचंद्रांचे सावत्र बंधूच आहेत. खरे संकट भरताचे नसून कैकेयीला दशरथाने दिलेल्या वचनाचे आहे. हे यावरून स्पष्टच होत नाही काय ? म्हणूनच राज्याभिषेकाचे बोलावणे भरताच्या आजोळी गेलेले नाही. म्हणूनच राज्याभिषेकाचा मुहूर्त इतक्या घाईचा ठरविण्यात आला व म्हणूनच प्रथमपासूनच राम व भरत या दोघांची पृथक्पणे राज्याचे वारसदार म्हणून वाढ करण्यात आलेली आहे. एरवी राम-लक्ष्मण व भरत-शत्रुघ्न अशा जोड्या पडण्याचे काहीच कारण नव्हते. लक्ष्मणाप्रमाणेच भरतही रामांचा अनुयायी राहणेच स्वाभाविक होते. या कराराने रामांइतकाच भरताचाही राज्यावर धर्मतःच अधिकार होता, ही कराराची गोष्ट इतकी कसोशीने गुप्त ठेवण्यात आली होती की, कैकेयीलाही ही जाणीव नाही. पण रामचंद्रांच्या ध्यानात ही

गोष्ट येताच, चौदा वर्षांच्या वनवासानंतरही या करारामुळे राज्याचा अधिकारी भरतच राहणार हे स्पष्ट दिसत असताही, बंधुवत्सल रामांनी भरताला मोकळ्या मनाने हा करार सांगितला. आपणाऐवजी त्याची भाग्यसंपदा त्याने भोगण्यानेच रामांना वास्तविक आनंद झाला असता. अंतःकरणाच्या भव्यतेचे हे केवढे प्रात्याक्षिक. भरताचा हा अधिकार त्याला प्रत्यक्ष द्यायला राम इतके उत्सुक आहेत की, वनवासातून परत येताना भरद्वाजाच्या आश्रमातून हनुमंताला अयोध्येला जावयास सांगताना ते म्हणतात -

" भरताला माझे कुशल सांगून सीता व लक्ष्मणांसहित मी प्रतिज्ञा पार पाडून परत आल्याचे सांग. ही वार्ता कानावर पडताच भरताच्या चेहऱ्यावर काय सूक्ष्म छटा उमटतात त्या तू नीट पाहिल्या पाहिजेस. त्याच्या हालचालींवरून, मुखवर्णावरून, दृष्टीत पडणाऱ्या फरकांवरून व उद्‌गारांवरून त्याच्या अंतरंगातील खरे भाव तुला ओळखता आले पाहिजेत. सर्व इच्छा पुरविण्याइतके समर्थ, हत्ती, अश्व, रथ इत्यादिकांनी गजबजलेले, पितृपितामहांचे राज्य कुणाचे मन विचलित करणार नाही ? जर इतके दिवस राज्य चालविण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असल्यामुळे भरताला स्वतः राज्यपद घेण्याची इच्छा झाली असेल तर त्याने सर्व पृथ्वीचे राज्य करावे, अशीच माझी इच्छा झाली आहे. " केवळ भरताने प्राणत्यागाची सिध्दता केल्यामुळेच रामांनी राज्यपदाचा स्वीकार केला. त्यांनी स्वतः लक्ष्मणाला म्हटल्याप्रमाणे केवळ बंधूसाठीच त्यांनी राज्य स्वीकारले, स्वतःचा हक्क म्हणून ते त्यांना नको होते.

## आदर्श मित्र

श्रीरामचंद्रांनी ज्यांना स्वतःच्या बरोबरीचे स्थान देऊन आपले मित्र मानले होते अशा रामायणात दोन व्यक्ती आहेत. एक निषादाधिपती गुह व दुसरा वानरराज सुग्रीव होय. गुहाची व रामचंद्रांची प्रगाढ मैत्री महर्षी वाल्मीकींनी ' तत्र राजा गुहो नाम रामस्यात्मसमः सखा ।' (वा. रा. : अयोध्याकांड : स. ५०, श्लो. ३२) या शब्दांनी व्यक्त केलेली आहे. गुह स्वतः रामावरील आपल्या प्रेमासंबंधी असे म्हणतो की -

" या संपूर्ण विश्वात रामाइतके मला दुसरे कोणीही प्रिय नाही. मी तुला सत्याचीच शपथ घेऊन सांगतो. " रामचंद्रांचेही गुहावर असेच आत्यंतिक प्रेम आहे. वनवासातून आपण परत आल्याची पहिली वार्ता हनुमंताने गुहाला सांगण्याचीच ते आज्ञा देतात. त्याच्यासंबंधीचे आपले प्रेम व्यक्त करताना ते म्हणतात -

" मी निरोगी, तापरहित व चांगल्या स्थितीत आहे हे ऐकून गुहाला अत्यंत आनंद होईल. कारण मी माझ्यावर जितके प्रेम करीत असेन तितकेच गुहावर करतो. तो माझा सखा आहे. "

पण रामांना आपल्या या मित्राच्या बाबतीत त्याला भेटण्यापलीकडे व निरोप पाठविण्यापलीकडे दुसरे काही विशेष करण्याचे कारण पडलेले नाही. गुहाने मात्र भरताच्या चित्रकूटावर जाण्याच्या प्रसंगी संशयित होऊन रामाच्या प्रेमाने भरताला विरोध करावयाची सिध्दता चालविली असल्याचे दिसून येते. रामचंद्रांच्या मित्रप्रेमाचे सारे उत्कट आविष्कार त्यांच्या सुग्रीवाशी झालेल्या व्यवहारातून प्रकट झालेले आहेत. अग्निसाक्षीने सुग्रीवाशी मित्रत्व जोडले जाऊन त्यांच्या तोंडून, " तूं माझा आवडता मित्र असून आपले सुख व दुःख आता अगदी एकरूप झालेले आहे, " असे वाक्य निघताच तो त्यांच्या दुःखाशी एकरूप होण्याआधी, त्याच्याकडून कसल्याही सहाय्याची कल्पना निघण्यापूर्वी, रामच त्याच्या दुःखाशी एकरूप होऊन जातात. ते म्हणतात -



" मैत्रीचे फळ एकमेकांच्या उपयोगी पडणे हेच आहे. म्हणून तुझ्या स्त्रीचे अपहरण करणाऱ्या वालीचा मी वध करीन."

त्याच्या दुःखाशी राम इतके एकरूप झालेले आहेत व त्याच्या दुःखाचा अंतःकरण्याची इच्छा त्यांच्या अंतःकरणात इतकी बळावलेली आहे की ते, म्हणतात -

" तुझा अपमान झाल्याचे ऐकून माझा राग अनावर होत आहे. तू मन स्थिर करून मी धनुष्य सज्ज करीत आहे तोवर आपला वृत्तांत मला सांग. मी धनुष्यावर एकदा बाण चढविला की, तुझा शत्रु संपला असेच समज. " सुग्रीव आपले काम करील तेव्हा करील. पण आपण त्याला ताबडतोब दुःखमुक्त केले पाहिजे, ही भावना त्याच्या अंतःकरणात इतकी प्रबळ आहे की, त्यासाठी दोषारोप पत्करण्याची सिध्दता करून त्यांनी मित्रत्व जोडल्यापासून दिवस संपावयाच्या आत सुग्रीवाच्या शत्रूला ठार मारून त्याला किष्किंधेच्या राजसिंहासनावर बसविले आहे. संतापाच्या भरात सुग्रीवाशी आपण कठोर शब्द

बोलल्यामुळे लक्ष्मण खरोखरीच त्याला ठार मारील असे वाटून गहिवरलेले राम त्याला म्हणतात -

" जर सुग्रीवाच्या हातून समयाचे अतिक्रमण झालेले असले तरी त्याला एकही कठोर अक्षर न बोलता तू सामाने व प्रेमानेच त्यांच्याशी बोलले पाहिजे. " आपल्या मित्राच्या थोड्याही गोष्टीचे कौतुक करण्याची त्यांची वृत्ती इतकी उत्कट आहे की, ज्याला त्यांनी जगात जगण्यासारखी परिस्थिती उत्पन्न करून देऊन सारे वानरराज्य मिळवून दिले, त्याने नुसती सीतेच्या शोधासाठी हालचाल सुरू केली न केली, तोच राम म्हणतात -

" इंद्राने वर्षाव करणे, सूर्याने अंधार नाहीसा करणे व चंद्राने आपल्या ज्योत्स्नेने रात्र उजळणे हे जितके स्वाभाविक तितकेच तुझ्यासारख्या मित्रांनी आपल्या मित्राचे प्रेम संपादन करण्यासाठी जिवाचे रान करणे हे स्वाभाविक आहे. "

लंकेत सुग्रीवाचे सैन्य आल्यानंतर रावण आपल्या सौधावरून त्या सैन्याचे निरीक्षण करीत असता सुग्रीवाचे भान सुटून तो एकदम त्याच्यावर चालून गेला. काही वेळाने आपली युक्तीने सुटका करून घेऊन तो परत आल्यावर राम त्याला म्हणतात -

" माझ्याशी मुळीच विचार न करता तू हे साहस का केलेस ? राजे लोकांनी असे भलतेच साहस करावयाचे नसते. मी, हे सैन्य व बिभिषण या सर्वांनाच अतिशय काळजीत टाकून तू हे भलतेच धाडस केले आहेस. यापुढे असा भलता विचार मनातदेखील आणू नकोस. तुला काही झाले तर मला सीता, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न अथवा माझे शरीर यांचे तरी काय करावयाचे आहे ? तुझे बल महेंद्र व वरुण याप्रमाणे आहे, हे माहीत असूनही तू परत येण्यापूर्वी मी असा दृढ निश्चय केला होता की, तुला काही झाले तर रावणाचा सर्वनाश करून व बिभिषणाला लंकेचे राज्य देऊन भरताला अयोध्येच्या सिंहासनावर बसवावे व आपण स्वतः देहत्याग करावा. " मैत्रीचे याहून दुसरे कोणते प्रत्यंतर असू शकेल ? सुग्रीवात व स्वतःच्या व्यक्तिमत्वात त्यांनी काडीचाही भेद ठेवला नव्हता. सुग्रीवालाही या गोष्टीची इतकी उत्कट जाणीव होती की अखेरीस रामचंद्रांच्या बरोबरच त्यानेही शरयूप्रवेस करून आपल्या प्रगाढ मैत्रीचा अमर शिलालेख जगाच्या इतिहासाच्या पृष्ठभागावर टाकलेला आहे. या रामनिर्णयाच्या प्रसंगी या दोन अभूतपूर्व मित्रांच्या मित्रत्वाचे शब्दचित्र रेखाटताना महर्षि वाल्मीकी म्हणतात -

" याच वेळी सुग्रीवाने रामचंद्रांना वंदन करून सांगितले की, ' अंगदाला राज्याभिषेक करून मी आलो आहे, तुमच्याच मागोमाग देवगतीला येण्याचा मी निश्चय केलेला आहे. ' त्याचे ते उद्गार ऐकताच त्याचे मित्रत्व आठवून राम म्हणाले, सख्या, सुग्रीवा ! आपला आजवर कधीच वियोग झालेला नाही. मग देवलोकाला अथवा परमपदालाही आपण बरोबरच कसे जाणार नाही ? "

राजद्वारापासून स्वर्गदारापर्यंत ज्यांच्या सहजीवनात कधीच खंड पडलेला नाही असे हे सुग्रीव व राजा यांचे सौहार्द मानवतेच्या इतिहासात अनन्वय अलंकाराचे उदाहरणच गणले जाईल.

## आदर्श वल्लभ

रामचंद्र हे आदर्श जीवनाच्या सर्व दालनांना व्यापून उरणारे असले तरी ते आदर्श वल्लभ होते हे कोणी कधीच कबूल करणार नाही. राम म्हटले की सीतापरित्यागाचा प्रसंग आठवून त्यांनी त्या साध्वीचे दुःखात लोटलेले जीवन प्रत्येकाच्या डोळ्यासमोर उभे राहते व या स्थितीत त्यांना आदर्श वल्लभ कसे म्हणता येईल असेच कोणालाही वाटते. पण त्यांच्या चरित्राचा वितार करताना भावना व कर्तव्य यांच्या इतक्या स्पष्ट सीमारेषा प्रत्ययास येतात की, त्यात भावनेच्या अश्रुपुरांनी कर्तव्याची सीमारेषा जशी कधीच पुसली जात नाही, त्याचप्रमाणे कर्तव्याच्या कठोर दीक्षेने भावनेचे कढही विरून जात नाहीत. सीतेवर त्यांचे आत्यंतिक प्रेम होते. अरण्यकांडात त्यांनी सीतेसाठी जे विलाप केले आहेत, अवर्षणांवर त्यांनी जे अश्रुमोचन केलेले आहे व सीतेचा शोध करण्यासाठी झाडादगडांना जे आलाप ऐकविले आहेत ते त्यांच्या उत्कट प्रेमाची साक्ष द्यावयास पुरेसे आहेत. सीतेच्या कठोर वाक्यांनी आश्रम सोडून आलेल्या लक्ष्मणाला त्यांनी दोष दिला. वनवासात तिचे अनुरंजन करण्यासाठी त्यांनी परोपरीने जी खटपट चालविली होती तिचे अरण्यकांडाच्या पूर्वार्धात वाल्मीकींनी रेखाटलेले शब्दचित्र दांपत्यजीवनावरील वाङ्‌मयाचा अमर अलंकार होण्याच्या योग्यतेचे आहे. सीतेच्या विरहदुःखाने रामचंद्रांचे गांभीर्य सुटून ते मोह पावल्यामुळे सुग्रीवाने व लक्ष्मणासारख्या अनुचरांनीही त्यांचे समाधान करण्याचे प्रसंग रामायणात अनेक ठिकाणी वर्णिलेले आहेत. सीतेजवळ रामचंद्रांच्या दीनदशेचे वर्णन करताना मारुती म्हणतात -

" सिंहाने पीडिलेल्या हत्तीप्रमाणे तुझ्या विरहाच्या शोकाने रामांना कुठेच बरे वाटत नाही. तुझ्या स्मृतीत राम इतके देहभान विसरलेले असतात की, अंगावर चढलेल्या कृमिकीटकांना अथवा सरपटणाऱ्या प्राण्यांना वारण्याचेही भान त्यांना नसते. केवळ शोक व तुझे ध्यान यावाचून रामचंद्रांची दुसरी कोणतीच

बोलल्यामुळे लक्ष्मण खरोखरीच त्याला ठार मारील असे वाटून गहिवरलेले राम त्याला म्हणतात -

" जर सुग्रीवाच्या हातून समयाचे अतिक्रमण झालेले असले तरी त्याला एकही कठोर अक्षर न बोलता तू सामाने व प्रेमानेच त्यांच्याशी बोलले पाहिजे. " आपल्या मित्राच्या थोड्याही गोष्टीचे कौतुक करण्याची त्यांची वृत्ती इतकी उत्कट आहे की, ज्याला त्यांनी जगात जगण्यासारखी परिस्थिती उत्पन्न करून देऊन सारें वानरराज्य मिळवून दिले, त्याने नुसती सीतेच्या शोधासाठी हालचाल सुरू केली न केली, तोच राम म्हणतात -

" इंद्राने वर्षाव करणे, सूर्याने अंधार नाहीसा करणे व चंद्राने आपल्या ज्योत्स्नेने रात्र उजळणे हे जितके स्वाभाविक तितकेच तुझ्यासारख्या मित्रांनी आपल्या मित्राचे प्रेम संपादन करण्यासाठी जिवाचे रान करणे हे स्वाभाविक आहे. "

लंकेत सुग्रीवाचे सैन्य आल्यानंतर रावण आपल्या सौधावरून त्या सैन्याचे निरीक्षण करीत असता सुग्रीवाचे भान सुटून तो एकदम त्याच्यावर चालून गेला. काही वेळाने आपली युक्तीने सुटका करून घेऊन तो परत आल्यावर राम त्याला म्हणतात -

" माझ्याशी मुळीच विचार न करता तू हे साहस का केलेस ? राजे लोकांनी असे भलतेच साहस करावयाचे नसते. मी, हे सैन्य व बिभिषण या सर्वांनाच अतिशय काळजीत टाकून तू हे भलतेच धाडस केले आहेस. यापुढे असा भलता विचार मनातदेखील आणू नकोस. तुला काही झाले तर मला सीता, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न अथवा माझे शरीर यांचे तरी काय करावयाचे आहे ? तुझे बल महेंद्र व वरुण याप्रमाणे आहे, हे माहीत असूनही तू परत येण्यापूर्वी मी असा दृढ निश्चय केला होता की, तुला काही झाले तर रावणाचा सर्वनाश करून व बिभिषणाला लंकेचे राज्य देऊन भरताला अयोध्येच्या सिंहासनावर बसवावे व आपण स्वतः देहत्याग करावा. " मैत्रीचे याहून दुसरे कोणते प्रत्यंतर असू शकेल ? सुग्रीवात व स्वतःच्या व्यक्तिमत्वात त्यांनी काहीचाही भेद ठेवला नव्हता. सुग्रीवालाही या गोष्टीची इतकी उत्कट जाणीव होती की अखेरीस रामचंद्रांच्या बरोबरच त्यानेही शरयूप्रवेस करून आपल्या प्रगाढ मैत्रीचा अमर शिलालेख जगाच्या इतिहासाच्या पृष्ठभागावर टाकलेला आहे. या रामनिर्णयाच्या प्रसंगी या दोन अभूतपूर्व मित्रांच्या मित्रत्वाचे शब्दचित्र रेखाटताना महर्षि वाल्मीकी म्हणतात -

" याच वेळी सुग्रीवाने रामचंद्रांना वंदन करून सांगितले की, ' अंगदाला राज्याभिषेक करून मी आलो आहे, तुमच्याच मागोमाग देवगतीला येण्याचा मी निश्चय केलेला आहे. ' त्याचे ते उद्‌गार ऐकताच त्याचे मित्रत्व आठवून राम म्हणाले, सख्या, सुग्रीवा ! आपला आजवर कधीच वियोग झालेला नाही. मग देवलोकाला अथवा परमपदालाही आपण बरोबरच कसे जाणार नाही ? "

राजद्वारापासून स्वर्गद्वारापर्यंत ज्यांच्या सहजीवनात कधीच खंड पडलेला नाही असे हे सुग्रीव व राजा यांचे सौहार्द मानवतेच्या इतिहासात अनन्वय अलंकाराचे उदाहरणच गणले जाईल.

## आदर्श वल्लभ

रामचंद्र हे आदर्श जीवनाच्या सर्व दालनांना व्यापून उरणारे असले तरी ते आदर्श वल्लभ होते हे कोणी कधीच कबूल करणार नाही. राम म्हटले की सीतापरित्यागाचा प्रसंग आठवून त्यांनी त्या साध्वीचे दुःखात लोटलेले जीवन प्रत्येकाच्या डोळ्यासमोर उभे राहते व या स्थितीत त्यांना आदर्श वल्लभ कसे म्हणता येईल असेच कोणालाही वाटते. पण त्यांच्या चरित्राचा वितार करताना भावना व कर्तव्य यांच्या इतक्या स्पष्ट सीमारेषा प्रत्ययास येतात की, त्यात भावनेच्या अश्रुपुरांनी कर्तव्याची सीमारेषा जशी कधीच पुसली जात नाही, त्याचप्रमाणे कर्तव्याच्या कठोर दीक्षेने भावनेचे कढही विरून जात नाहीत. सीतेवर त्यांचे आत्यंतिक प्रेम होते. अरण्यकांडात त्यांनी सीतेसाठी जे विलाप केले आहेत, अवर्षणांवर त्यांनी जे अश्रुमोचन केलेले आहे व सीतेचा शोध करण्यासाठी झाडादगडांना जे आलाप ऐकविले आहेत ते त्यांच्या उत्कट प्रेमाची साक्ष द्यावयास पुरेसे आहेत. सीतेच्या कठोर वाक्यांनी आश्रम सोडून आलेल्या लक्ष्मणाला त्यांनी दोष दिला. वनवासात तिचे अनुरंजन करण्यासाठी त्यांनी परोपरीने जी खटपट चालविली होती तिचे अरण्यकांडाच्या पूर्वार्धात वाल्मीकींनी रेखाटलेले शब्दचित्र दांपत्यजीवनावरील वाङ्‌मयाचा अमर अलंकार होण्याच्या योग्यतेचे आहे. सीतेच्या विरहदुःखाने रामचंद्रांचे गांभीर्य सुटून ते मोह पावल्यामुळे सुग्रीवाने व लक्ष्मणासारख्या अनुचरांनीही त्यांचे समाधान करण्याचे प्रसंग रामायणात अनेक ठिकाणी वर्णिलेले आहेत. सीतेजवळ रामचंद्रांच्या दीनदशेचे वर्णन करताना मारुती म्हणतात -

" सिंहाने पीडिलेल्या हत्तीप्रमाणे तुझ्या विरहाच्या शोकाने रामांना कुठेच बरे वाटत नाही. तुझ्या स्मृतीत राम इतके देहभान विसरलेले असतात की, अंगावर चढलेल्या कृमिकीटकांना अथवा सरपटणाऱ्या प्राण्यांना वारण्याचेही भान त्यांना नसते. केवळ शोक व तुझे ध्यान यावाचून रामचंद्रांची दुसरी कोणतीच

अवस्था मी पाहिलेली नाही. ते सतत जागे असतात व कधी चुकून झोप लागलीच तर 'सीते' अशी मधुर हाक मारीत एकदम जागे होतात. फलपुष्प अथवा जे काही स्त्रियांना मनोरम वाटणारे पदार्थ त्यांच्या दृष्टीला पडतील ते पाहताच ते दुःखाचा सुस्कारा सोडून निस्तःब्ध होतात. " संकटांच्या कड्यांना सतत तोलून धरणाऱ्या रामचंद्रांच्या विकलतेचे हे शब्दचित्र किती हृदयस्पर्शी आहे ! स्वतः देवी सीताच " मत्कृते काकमात्रेऽपि ब्रम्हास्त्रं समुदीरितम् " या वाक्यांनी रामांच्या स्वतःवरील प्रेमाचा प्रत्यय देत आहे. वनात एका कावळयाने सीतेच्या चरणांगुष्ठावर चंचुप्रहार करताच देहभान विसरून त्याच्यावर एकदम ब्रम्हास्त्राचा प्रयोग रामचंद्रांनी करावा काय ? अखेरीस सीतापरित्याग करून रामचंद्रांनी कर्तव्याच्या बलिवेदीवर स्वतःचेच जीवन जाळून घेतले आहे. सीतेचा वनात परित्याग करून लक्ष्मण परत आल्यावर त्याने जी रामचंद्रांची अवस्था पाहिली तिचे शब्दचित्र उत्तरकांडांत महर्षींनी अविस्मरणीय पध्दतीने रेखाटले आहे. सीतेची सुवर्णप्रतिमा निर्माण करून रामांनी यज्ञदीक्षा घेतली ; पण वल्लभेच्या स्थानावर दुसरी मूर्ती कल्पिली नाही. एकपत्नीत्वाच्या महान आदर्शाचा राम हा पर्यायशब्द झालेला आहे.



## आदर्श राजा

प्रजा ही रामचंद्राचे काय नव्हती ? सीतेच्या परित्यागानंतर हृदय पिळवटून टाकणाऱ्या त्या प्रसंगाने राम इतके विव्हळ झाले होते की चार दिवस अश्रूमोचन करीत त्यांनी घालविले. या चार दिवसात त्यांच्या हातून राज्यव्यवहार व लोकांची दुःखे समजावून घेण्याचे काम झाले नाही, त्यांचे त्यांना इतके वाईट वाटत होते की, लक्ष्मणाजवळ त्यांनी आपल्या अंतरीचे भाव व्यक्त करताना म्हंटले आहे -

"माझ्या हृदयाला जी एक गोष्ट दुःख देत आहे ती ऐकूण घे व त्याप्रमाणे कर. या दुःखद घटनेने माझे हृदय इतके भारावलेले होते की, गेले चार दिवस मी पौरजनांचे कोणतेही काम करू शकलो नाही, याची जाणीव झाली की, मला मर्मांतिक वेदना होतात. पुरोहित, मंत्री, प्रजेतील कार्यार्थी असे सर्व स्त्री-पुरूष यांना तू राजसभा त्वरित मोकळी कर. जो राजा रोज प्रजेची कामे करत नाही, तो घोर नरकात जातो यात काही शंका नाही." केवढे हे प्रजावात्सल्य व त्या बाबातीतल्या स्वकर्तव्याची तरी केवढी ही प्रखर जाणीव ! प्रजेनेच जेथे त्यांना विश्रामाची आवश्यकता प्रतिपादावी त्या आयुष्यातील अत्यधिक दुःखद प्रसंगदेखील "आपण प्रजेच्या कार्याकडे दुर्लक्ष करण्याइतके भावानावश झालो." ही जाणीवच त्यांच्या हृदयाला अधिक कष्टी करत आहे. अशा या राजावर प्रजेचे किती विलक्षण प्रेम असेल ! राजा दशरथाजवळ प्रजेने रामांचे जे वर्णन केले आहे, त्यावरून त्यांच्याविषयी प्रजेच्या मनात कोणते उत्कट भाव नांदत होते ते स्पष्ट होते. प्रजा म्हणते -

"ह्या जगता मध्ये रामच खरा सत्यपुरूष असून अर्थासहवर्तमानधर्मही साक्षात रामापासून निघालेला आहे. राम ग्रामाच्या अथवा नगराच्या रक्षणार्थ जेव्हा लक्ष्मणसह वर्तमान संग्रामामध्ये जातो, तेव्हा शत्रूला जिंकल्यावाचून माघारी फिरकतच नाही आणि गजावर अथवा रथामध्ये आरूढ होऊन संग्रामातून परत आल्यानंतर स्वजनाप्रमाणे पौरजनांना कुशल प्रश्न करीत असतो. कुणावर दुःखाचे प्रसंग आले असता तो अत्यंत दुःखित होतो आणि प्रजाजनांमध्ये कोणत्यांही उत्सव सुरू झाला असता पुत्राच्या सुखाने संतुष्ट होणाऱ्या पित्याप्रमाणे तो संतुष्ट होतो. तो सत्यवचनी, महाधनुर्धारी, जितेंद्रिय, स्मितपूर्वक भाषण करणारा असून तो मनापासून प्रजेचे पालन करतो. त्याची अवकृपा कधी व्यर्थ होत नाही. सर्वांना आनंददायक अशा सद्‌गुणांनी हा युक्त आहे. तोच आपला नाथ असावा अशी पृथ्वीला इच्छा आहे. "

ज्या राजाला प्रजा अंतःकरणपूर्वक ही विशेषणे लावील त्याचे भाग्य किती थोर ! वनात जावयास राम निघाले असता महर्षि म्हणतात -

" तापलेल्या मनुष्याने पाण्याकडे धाव घ्यावी त्याप्रमाणे त्या आबाल वृध्द नगरीने अत्यंत कष्टी होऊन रामांकडे धाव घेतली. " रथाच्या पाठीमागून, बाजूने व पुढून गर्दी करून ते रथाला लोंबकळू लागले व आसवांचे पूर वाहवीत व अति विलाप करीत ते म्हणू लागले, " हे सूता, घोड्यांचे लगाम आवर. रथ हळू हळू ने. पुन्हा रामांचे मुख आमच्या दृष्टीला पडणार नाही. आम्हाला डोळे भरून रामांकडे एकदा पाहू तरी दे. "

अखेरीस तर रामाच्या पाठोपाठ अयोध्यानगरीतले सर्व प्रजाजन अरण्यात जाऊ लागले. ते म्हणाले -

जर आपण रामांना पाहू शकणार नाही तर पत्नी, घर, धन व सुख यांचे महत्त्वच काय आहे ? जी जी मंडळी रामचंद्रांना घरी परत न आणता आपापल्या घरी गेली त्यांची त्यांच्या स्त्रियांनीदेखील निर्भत्सना केली. एकुलत्या एका पुत्राला आई

विचारीना की पतीचा स्त्रिया सन्मान करीनात, असे वाल्मीकी रामायणात ४८ व्या सर्गात वर्णन आहे. किंबहुना ४६ ते ४९ हे सर्ग म्हणजे प्रजाजनांनी रामचंद्रांसाठी व्यक्त केलेल्या भावनांचे पूरच आहेत. महर्षि वाल्मीकी म्हणतात -

जेथे राम राजा नाही ते राष्ट्र नाही. ते वनच राष्ट्र होईल की जेथे राम राहतील ! केवढी ही विलक्षण लोकप्रियता ! जगातील राज्यसंस्थेच्या इतिहासात प्रजा व राज्यसंस्था यांचे सूर्य व त्याच्या प्रभेसारखे इतके ऐक्य आजवर कधी झाले नाही व पुढे कधी होणार नाही. यांचे अत्यंत उत्कट दृश्य रामचंद्रांच्या निर्णयाच्यावेळी दृष्टीस पडले आहे. त्या निर्णयाचे वर्णन करताना महर्षि वाल्मीकी म्हणतात -

राजाच्या मागोमाग सर्व प्रजाच महाप्रस्थानाला निघून गेल्यामुळे अयोध्या कित्येक दिवस उजाड झाली होती. आणि प्रजेने तरी रामांवर इतके प्रेम का करून नये ? रामचंद्रांनी तिच्यासाठी काय करावयाचे ठेवले होते ? प्रजेसाठी त्यांनी सीतेचा परित्याग केला व तो करीत असताना ते वाक्य बोलले आहेत.

" बंधूनो, प्रजेत निंदा होऊ नये म्हणून मी सीतेला सोडीन यात काय नवल, पण तुमच्यासाठी माझ्या जीवितालादेखील सोडताना मी यत्किंचित कचरणार नाही. " अशा निष्ठेने प्रजेसाठी जे रात्रंदिवस खपले त्यांच्या जीविताच्या अंताबरोबरच प्रजेनेही आपले जीवित संपविले असले तर त्यात आश्चर्य वाटावयास नको. रामराज्याचे वर्णन करताना महर्षि वाल्मीकी लिहितात -

" राम राज्य करीत असताना स्त्रियांना अकाली वैधव्य येऊन शोक करण्याचा प्रसंग आला नाही. सर्पजन्य व व्याधिजन्य भयही त्या वेळी प्रजेला प्राप्त झाले नाही. रामराज्यात कुणी चोर नव्हता. कुणावरही अनर्थकारक प्रसंग ओढवला नाही. वृध्दांना बालांची प्रेतकर्मे करावी लागली नाहीत. सर्वजण आनंदी होते, धर्मनिष्ठ होते आणि रामाच्या वर्तनाकडे लक्ष देऊन लोक हिंसेपासून पराङ्मुख होते. ते स्वकर्मे करीत, असत्याचे अवलंबन करीत नसत. "

किती आदर्श व सुखी प्रजाजीवनाचे हे चित्र आहे ! कर्तव्यनिष्ठाला ज्याप्रमाणे रामराज्यात स्थान असे त्याचप्रमाणे कर्तव्यभ्रष्ट होणाऱ्याला शासनही असे. उत्तरकांडातील शंबूक कथा, लक्ष्मणाचा दंड ही त्याची उदाहरणे आहेत. राज्याच्या कर्तव्यावर रामचंद्रांनी भरताला अयोध्याकांडाच्या १०० व्या सर्गात जो उपदेश केला आहे तो कोणत्याही राज्यसंस्थेला आदर्शभूत व्हावा, असाच आहे. राज्यसंस्थेच्या आत्यंतिक विकासनात्मक स्वरूप दिग्दर्शित करावयाचे झाले तर रामराज्य असाच शब्द वापरणे भाग पडते. याहून रामाचे याबाबतीत आदर्श जीवन व्यक्त करावयास दुसऱ्या कोणत्या पुराव्याची आवश्यकता आहे ?

## पराक्रमी आत्मप्रत्यय

या सगळ्या सद्गुणांबरोबरच रामचंद्र हे सामर्थ्याचे महानिधीच होते, असे सर्व रामायणात वर्णन आहे. त्यांच्या शत्रूंनीच यासंबंधी त्यांच्या बाबतीत काढलेले उद्‌गार लक्षात ठेवण्यासारखे आहेत. अकंपन नावाच्या रावणाचा दूत रावणाजवळ रामचंद्रांच्या सामर्थ्याचे वर्णन करताना असे सांगतो आहे की -

" राम महातेजस्वी असून सर्व धनुर्धरांमध्ये श्रेष्ठ आहे. दिव्यास्त्ररूप साधनांनी संपन्न असून युध्दात पराकाष्ठेचे शौर्य गाजवणारा आहे. राम क्रुध्द झाला तर पराक्रम करून त्याचा पराजय करणे कठीण आहे. भरून चाललेल्या नदीचा वेगही तो बाणाने परत फिरवील आणि पृथ्वी रसातळाला जाऊ लागली तर तो तिचाही उध्दार करील. "

रामचंद्रांच्या पराक्रमाची अशी वर्णने रामायणात सर्वत्र आहेत. भीती नावाचा पदार्थ त्यांच्या अंतःकरणाला कोठेही स्पर्श करताना दिसत नाही. लहानपणीच त्यांनी ताटकेचा विनाश करून शिवधनुष्यभंगासारखे व परशुरामाच्या पराभवासारखे अद्‌भुत पराक्रम केलेले आहेत. दंडकारण्यात शिरताच पंचवटीत १४ हजार राक्षसांचा फडशा पाडून राक्षसराष्ट्रात त्यांनी थरकाप उत्पन्न केला होता. नुसत्या ' र ' या अक्षराने सुरू होणाऱ्या शब्दांनादेखील मारीच घाबरत असे, इतका रामांच्या पराक्रमाचा त्याला धाक बसल्याचे अरण्यकांडाच्या अखेरीस वर्णन आहे. वालीसारख्या त्या काळच्या सर्वश्रेष्ठ व्यक्तीला केवळ एकाच बाणाने रामचंद्रांनी युध्दात लोळविले यावरून त्यांचा आत्मप्रत्यय एवढा दांडगा आहे की, तो त्यांच्या पराक्रमापेक्षाही मनाला अधिक मोह उत्पन्न करतो. या त्यांच्या आत्मप्रत्ययाचे आत्यंतिक निदर्शन बिभिषणाच्या शरणागतीच्या वेळी घडलेले आहे. ते म्हणतात -

" जो एकदाच येऊन मी आपलाच आहे असे म्हणेल त्याला अभय प्रदान करणे हे माझे व्रत आहे. " स्वतःचे कोणीही सूक्ष्मदेखील अहित करू शकत नाही, इतका स्वतःच्या सामर्थ्याच्या विलक्षण आत्मप्रत्यय त्यांच्या ठिकाणी निसर्गतःच आहे. अशा विलक्षण आत्मप्रत्ययाचे रूपांतर नेहमीच जगाच्या इतिहासात अहंकारात झाल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. पण रामचंद्रांच्याबाबतीत हे होऊ शकत नाही. याचे कारण त्यांच्या अंतःकरणाची धर्म ही प्रेरकशक्ती आहे. ते स्वतःच लक्ष्मणाला

असे सांगतात -

" लक्ष्मणा, मी जर संतापलो तर एकट्या अयोध्येची कथाच काय, पण माझ्या बाणांच्या भरंवशावर संपूर्ण पृथ्वीचादेखील मी विजय करू शकेन. पण काय करावे ? ती अधर्माची गोष्ट होईल. धर्म व सद्‌गती या दोन गोष्टींसाठीच मी स्वतः होऊन ही आपत्ती पत्करली आहे."

दण्डकारण्यात पाऊल टाकताच राक्षसराष्ट्राच्या सामर्थ्याची नीट जाणीवही न करून घेता त्यांनी " तपस्वी जनांचे शत्रु जे राक्षस, त्यांचा संग्रामात वध करण्याची माझी इच्छा आहे. आता तपोधन ऋषींनी भ्रात्यासहवर्तमान माझे सामर्थ्य अवलोकन करावे, " हे जे उद्‌गार काढले त्यातून त्यांना स्वतःच्या पराक्रमाची केवढी खात्री होती हे स्पष्ट होते. लंकेच्या तटावर पाऊलही न ठेवता शरण आलेल्या बिभीषणाला ते खुशाल लंकेचा राजा म्हणून अभिषेक करतात. त्यांचा हा आत्मप्रत्यय इतका दांडगा आहे की, विरथ स्थितीत थकलेल्या व प्राणसंकटात आलेल्या रावणावरही आपले हत्यार न चालविता ते त्याला सोडून देतात व पूर्ण तयारीनिशी दुसऱ्या दिवशी समरास येण्याची सूचना देतात असे युध्दकाण्डात वर्णन आहे. असे अपार सामर्थ्यांचे जीवन धर्माच्या सूत्रांनी रामचंद्रांनी स्वतःच बांधून घेतले आहे. उत्कट भावना जशी त्यांच्या धर्मनिष्ठेच्या आड येऊ शकत नाही त्याचप्रमाणे अपार पराक्रम व दांडगा आत्मप्रत्ययही त्यांच्या कर्तव्यपरायणतेच्या आड येऊ शकत नाही. सीता व लक्ष्मण यांचा परित्याग ही त्यांच्या या प्रवृत्तीची आत्यंतिक उदाहरणेच होत. स्वतः रामचंद्रांनीच जानकीला त्यांच्या या जीवनसूत्राचे पुढीलप्रमाणे दिग्दर्शन केलेले आहे -

" क्षत्रियांनी जगात आर्त हा शब्द राहू नये एवढ्याचसाठी धनुष्य धारण करावयाचे असते. सीते, तू अथवा लक्ष्मण यांचाही वियोग मी सहन करीन; पण, क्षात्रधर्माच्या परिपालनाची मी केलेली प्रतिज्ञा कधीही मोडणार नाही. " भावना व कर्तव्य यांच्या प्रत्येक झगड्यात त्यांच्या बाबतीत कर्तव्यच विजयी ठरले आहे. त्यांच्या शत्रूंचेही त्यांच्या चारित्र्याबाबतीतले खात्रीचे उद्‌गार पाहिले म्हणजे ते किती भव्य असले पाहिजेत याची कल्पना येते. ज्याच्या भयाने मारीच थरकापत एकांतवासात जाऊन बसला होता त्याच्या वर्णनाची वेळ येताच तो म्हणतो -



" अमोघ पराक्रमी सज्जन राम मूर्तिमान धर्म आहे. इंद्र ज्याप्रमाणे देवांचा राजा आहे तसा राम सर्व लोकांचा राजा आहे. सर्व भूतांच्या हिताविषयी तो तत्पर आहे. "

प्रत्यक्ष शत्रूने रामाच्या रूपाने धर्म पृथ्वीवर अवतरल्याची कबूली द्यावी यापेक्षा त्यांच्या चारित्र्याच्या उदात्ततेचा आणखी कोणता पुरावा देणे अवश्य आहे ? सर्व गुणांचे राम हे इतके श्रेष्ठ परिमाण आहे की, मित्र तर काय पण शत्रूदेखील रामासारखा असावा अशीच अभिलाषा उत्पन्न व्हावी. रावण मरून पडल्यानंतर बिभीषण त्याची क्रिया करावयास ज्या वेळी सिध्द होईना त्या वेळी रामचंद्रांनी त्याला असे सांगितले आहे की -

" हा रावण कितीही व मिथ्याचारी असो. पण तेजस्वी, बलवान व शूर म्हणून त्याने अनेकवार समरांगणात कीर्ती मिळविली आहे ही गोष्ट काही खोटी नाही. मी असे ऐकले आहे की, या महानुभाव रावणाचा पराभव इंद्रादिक देवांनाही करता आला नाही. आपल्या जिवंतपणी ह्याने सारे विश्व थरकापविले होते. शत्रुत्व मरेपर्यंतच असते. रावण मेल्यावर त्याचे व माझे शत्रुत्व संपले आहे. तू याचा संस्कार केलाच पहिजेस. आता तो माझा शत्रू नसून तुझ्याशी त्याचे जे नाते आहे तेच माझ्याशीही लागू झाले आहे. विधिपूर्वक संस्कार याला झालेच पाहिजेत. यात तुझेच यश वाढणार आहे. " शत्रूशीदेखील त्यांच्या अंतःकरणाची केवढी उच्च धारणा आहे ! स्वतःला राज्यभ्रष्ट करणाऱ्या कैकयीच्याबाबतीत शपथपूर्वक चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल भरताला बजावून सांगतानाही त्यांच्या हृदयाची हीच श्रीमंती व्यक्त झाली आहे. रामचंद्रांचे कोणत्याही व्यक्तीशी वैर नव्हते. अधम, अत्याचार व पाप यांच्याविरूध्द त्यांनी खड्‌ग उपसले होते. राक्षसराष्ट्रांशी वैर करण्यातदेखील त्यांचा दुसरा कोणताही हेतू नव्हता. जिंकलेली राज्ये त्यांनी स्वतः घेतली नाहीत. विजेत्याचे राज्य या नात्याने किष्किंधेचे राज्य हे त्यांचे होते. सुहृद्‌भाव म्हणून ते सुग्रीवाला दिले, असे कोणी म्हणतील. पण तेथेही त्यांनी सुग्रीवाच्या मित्रत्वाने आपली धर्ममर्यादा सोडलेली नाही. राज्य जरी त्यांनी सुग्रीवाला दिले तरी ते त्याच्या संततीला दिले नाही. अंगदालाच युवराज नियुक्त करून राज्याची गादी त्यांनी वालीच्याच वंशात कायम ठेवली. लंकेचे राज्य तर निर्विवाद त्यांचेच होते. पण त्यांनी ते बिभीषणाच्या स्वाधीन करताना त्याला जो निरोप दिला आहे तो त्यांच्या अंतःकरणाची विशालता व त्यांच्या राजदंडाच्या आक्रमणाचे स्वरूप स्पष्टपणे व्यक्त करतो. ते

म्हणतात -

" तू धर्मज्ञ आहेस अशी माझी खात्री आहे. धर्ममर्यादा पाळूनच तू राज्य कर. कुबेराचा आदर्श तू या बाबतीत आपल्या समोर ठेव. या मर्यादेत वागणारे बुध्दिमान राजे नेहमीच चिरकाल राज्य करतात. " तात्पर्य: चारित्र्यदूषकांना शासन करणे व जगात धर्ममर्यादा वाढविणे हेच आर्यराष्ट्राच्या राजदण्डाचे रामचंद्रांनी खरे स्वरूप व्यक्त केले आहे. त्यांना कोणाचेही राज्य नको, संपत्ती नको व कसलीही खंडणी नको. शोषणाचा प्रश्न त्यांच्या नियंत्रणात उत्पन्नही होण्याचे कारण नाही. अशा स्थितीत राक्षसराष्ट्रांवर त्यांनी शस्त्र का उपसले असेल या बाबतीत रामचंद्रांची भूमिका समजावून न घेता त्यांच्या शत्रूंनी व प्रशंसकांनीही त्यांच्यावर अन्यायच केला आहे. प्रशंसकांच्या मते सीताहरण हेच रामचंद्रांनी राक्षसराष्ट्रावर खड्ग उपसण्याचे खरे कारण असून त्यात राम दोषी नाहीत असे आहे. आक्रमण रावणाने केले व रामांनी केवळ प्रतिकार केला असे वाल्मीकीचे प्रतिपादन असून रामचरित्राला धर्ममर्यादेच्या रक्षणासाठी खड्ग उपसण्याची उदात्त बैठक समर्थांनी प्राप्त करून दिली, असेही श्री. नानासाहेब देवांच्यासारख्या समर्थभक्तांनी आपल्या ' समर्थहृदया ' त म्हटले आहे. पण समर्थांची स्तुती करताना महर्षि वाल्मीकींची निंदा काही अपरिहार्य नाही. श्री. देव यांच्याइतकाच समर्थांविषयी आदर बाळगूनही समर्थांनी नवीन काही केल नसून या बाबतीत वाल्मीकींचाच केवळ अनुवाद केला आहे असे मी वाल्मीकि रामायणावरून दाखवू शकेन. देव म्हणतात की, त्यांनी रामायण प्रत्यक्ष वाचले नाही. तरीही ते निश्चित विधान करतात ही मात्र गंमत आहे ! माझे असे मत आहे की, रामचंद्रांनी प्रतिकार म्हणून राक्षसराष्ट्रावर स्वारी केलेली नाही. त्याला ते स्वरूप आले हा रावणाचा उन्मत्तपणा होय. पण जरी रावणाने सीताहरण केले नसते तरीही रामचंद्रांनी त्याच्या राज्याची धूळधाण केलीच असती. अरण्यकांडाच्या प्रारंभीच रामचंद्रांनी राक्षसांच्या वधाची घोर प्रतिज्ञा केली आहे. त्याचे कारण असे झाले की, दण्डकारण्यातील ऋषींनी नरमांसभक्षक राक्षसांनी तेथील ऋषींची चालविलेली घोर कत्तल रामांच्या दृष्टोत्पत्तीस आणून दिली. ती पाहून ही जमात मानवतेवरील घोर आपत्ती आहे या जाणिवेनेच ती नष्ट करून टाकण्याची प्रतिज्ञा त्यांनी केलेली आहे. आपल्या या कार्याचे स्वरूप समजावून सांगताना त्यांनी असे म्हटले आहे की -

" वनात राहून त्या त्या ऋतूत उत्पन्न होणाऱ्या केवळ कंदफलमूलावर उपजीविका करणाऱ्या ऋषींना हे नरमांसभक्षक राक्षस खाऊन टाकतात. ते बिचारे मला शरण आले व मी त्यांचे रक्षण करावे अशी त्यांनी मला विनंती केली. त्यांचे संरक्षण करण्याचे व्रत मी अंगीकारले आहे. " खराशी युध्द करीत असतानाही रामचंद्रांनी मुख्यतः त्याच्या या नरमांसभक्षणाच्या घोर कृत्यांबद्दल जाब विचारला आहे. ते म्हणतात -

" घोर पापांचे आचरण करणारे व लोकांचे अप्रिय करण्याची परंपरा चालविणारे असे जे तुझ्यासारखे लोक त्यांना ठार मारण्यासाठीच मला दण्डकारण्यात माझ्या राजांनी नियुक्त केले आहे, तू ज्या धर्मनिष्ठ लोकांना दण्डकारण्यात भक्षण केलेस त्यांची तुला भेट करून द्यावयास मी तुला ससैन्य परलोकात पाठविणार आहे. माझ्या बाणप्रहरांनी तू मरून नरकात पडल्यावर विमानातील ऋषी तुझी ती दुर्गती पाहतील. "

त्याचे हे उद्‌गार त्यांच्या राक्षसराष्ट्राविरूध्द शस्त्र उपसण्याच्या कारणाची योग्य कल्पना देतात. त्यावरून आक्रमण रामांनी केले असे राक्षसराष्ट्राच्या आजच्या पुष्कळ समर्थकांचे म्हणणे आहे ; पण आक्रमण अथवा प्रतिकार या काही नैतिक मूल्य ठरविणाऱ्या गोष्टी नसतात. आक्रमण का केले जाते हे पाहणे अवश्य असते. राक्षसराष्ट्र हे नरमांसभक्षक असून स्त्रियांच्या सौंदर्याची शिकार करणे व मानवतेचा विध्वंस करणे हे यांचे स्वरूप होते व त्यांनी मानवजातीची लांडगेतोड चालविली होती. त्यामुळे पशुता विरुध्द मानवता या झगड्यात पशुतेचे निखंदन करण्यासाठी रामचंद्रांनी खड्ग धारण केले होते. अपपरभावाचाही तेथे संबंध नव्हता. म्हणूनच त्यांनी बिभीषणावर नियंत्रणे ठेवली नाहीत. तात्पर्य, स्वतःच्या जीवनाच्या होमाने शाश्वत जीवनमूल्यांचे परिमाण उत्पन्न करणे व ते परिमाण बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाशवी शक्तींचे निखंदन करणे हे रामचंद्रांच्या विशाल जीवनाचे खरे रहस्य आहे. म्हणून राम हे महाकाव्यांचा विषय झाले आहेत व त्यांच्या जीवनावरील महाकाव्य हे मानवतेच्याच विकासमार्गाचा दीपस्तंभ ठरले आहे.

❑ ❑ ❑

## दिव्य दर्शन

अश्रूंनी भिजणारे, प्रर्थनेने उमलणारे
तुझे हृदय सुमन साई ममतेने भरलेले ।
अविनाशी अक्षय, जे विश्वरुप चैतन्य
तुझे पावन दर्शन साई, विश्वातून सजलेले ।
याचक ईच्छित, ते ते पुरवित
तुझे दिव्य आगमन साई
भक्तांस वाहिलेले ।
हिंदू वा पावन, करी तू पावन
तुझे रुप भगवा साई
अद्वैती नटलेले ।

**- युवराज दसनुरकर**
जळगाव

# महात्मा गांधींचे प्रभावी अस्त्र

# रामनाम

*रामनाम ही माझी अमोघ शक्ती आहे असे महात्मा गांधीजींनी 'हरिजन' 'यंग इंडिया' मधील अनेक लेखातून म्हटलेले आहे. माझ्या जीवनातील राजकीय-सामाजिक आणि व्यक्तिगत अशा सर्व प्रकारच्या संघर्षामध्ये रामनाम हेच माझे प्रभावी साधन होते असे म्हणणाऱ्या महात्माजींनीं पुढे तर दुर्धर शारिरीक व्याधींवर रामनाम हेच सर्वात प्रभावी व गुणकारी औषध आहे असेही सांगितले आहे व स्वतः अनुभवले आहे. गांधीजी कृत रामनाम महती -*

राम नामाची प्राथमिक दीक्षा मला अगदी लहानपणी आमच्या घरातील एक दाई रंभा कडून मिळाली आणि पुढे त्या बीजाचाच माझे सारे जीवन एक वटवृक्ष झालेले आहे. मनातील भीती दूर करण्यासाठी म्हणून रंभा दाईने मला रामनाम घेण्यास सांगितले आणि रामनामाचा व माझा प्रथम परिचय झाला. आज रामनाम माझी अमोघ शक्ती बनले आहे. त्याचे सारे श्रेय रंभा देईने केलेल्या रामनामाच्या त्या संस्कारालाच आहे.

रामायण पारायणाचाही माझ्या जीवनावर खूप प्रभाव आहे. लहानपणी माझे वडिल आजारी पडले असताना आमची बरीच वर्षे पोरबंदर येथेच गेली. तेथे वडिल रोज रात्री रामायण ऐकण्यास राममंदिरात जात. मी पण मधूनमधून जात असे. रामायण पाठ सांगणारे साधू बलेश्वर लाधा महाराज हे मोठे रामभक्त होते. त्यावेळी त्यांच्याबद्दल असे सांगितले जाई की, महाराजांच्या अंगावर सर्वत्र फोड फुडलेले होते. त्यांनी महादेवावर हजारो बेल वाहिले व ते बेल कोड फुटलेल्या अंगावर बांधून ते रामनामाचा जप करीत. आणि एके दिवशी त्यांच्या अंगावरील सर्व कोड नष्ट झाले. ही कथा खरी असो वा खोटी पण आम्हा रामायण ऐकणाऱ्या सर्वांचा त्यावर विश्वास होता हे मात्र खरे.

लाधा महाराजांची रामायण कथा मला विशेष आवडत होती. त्यांच्या दोहे - चौपाया म्हणण्याचा सुरेल आवाज मला भूरळ पाडी. त्यामुळेच मला आज तुलसीदासांचे रामायण म्हणजे भक्तीमार्गातील सर्वोत्तम ग्रंथ वाटतो.

* * *

विषय वासना, मोह माया यावर विजय मिळविण्यासाठी, ते जिंकण्यासाठी रामनाम किंवा कोणताही नामजप हाच सर्वोत्तम उपाय आहे. प्रत्येकाच्या आवडीला जो मंत्र पसंत पडेल तो त्याने जपावा. मला लहानपणी राम नामाचा मंत्र लाभला मला तोच आवडतो. मंत्र कोणताही चालेल पण तो अत्यंत श्रध्दाभाव व निष्ठेने जपला पाहिजे. मनाचे त्या मंत्रात तादात्म्य झाले पाहिजे. केवळ तोंडाने बडबड करणे म्हणजे जप नव्हे. तो उपयुक्त - लाभदायक ठरणार नाही. माझ्या लहानपणीचे असे किती तरी प्रसंग आहेत की ज्या प्रसंगातून संकटातून मी रामनामाच्या जपामुळे निभावून गेलो आहे. त्यावेळी हा मंत्र मी माझ्या मित्रानाही दिला एवढेच नव्हे तर काही अस्पृश्यांनाही रामनाम जप करण्यास सांगितले आहे.

* * *

राम, अल्लाह, गॉड हे सर्व मला एकाच अर्थाचे निरनिराळे शब्द वाटतात. हिंदू धर्मग्रंथामध्ये ईश्वराची हजार नावे आहेत असे म्हटलेले आहे तसेच रहिम, अल्लाह ही अशीच ईश्वरवाचक नावे आहेत. सर्व जगातील सर्व धर्म पंथाचा सारांश सर्वमानव बंधूभाव - सर्वधर्मसमभाव - सद्भाव हाच आहे.

* * *

केवळ रामनाम जपाने कार्य सिध्दीस जाईल म्हणून प्रयत्न न करता स्वस्थ बसून राहणे योग्य नाही. केवळ रामनामाने कार्य होणार नाही त्यासाठी प्रयत्न करावेच लागतील. फक्त रामनामाच्या शक्तीने प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तुमची जिद्द - निष्ठा वाढीला लागते व प्रयत्नांना रामनामाच्या शक्तीची जोड मिळून ते अधिक प्रभावी ठरतात.

रामनाम जपाची एक शक्ती आहे. जपाच्या या शक्तीद्वारे आपण नित्य परमेश्वराच्या अधिकाधिक समीप जात असतो. ही गोष्ट तुम्ही कोणा बुध्दीवादी - विचारवंताला विचारू नका कारण त्यांना याचा अनुभव असणार नाही. मी स्वतः एक अनुभव घेतलेला साधक म्हणून तुम्हाला मी अनुभवलेल्या रामशक्तीबद्दल सांगत आहे. माझ्या सर्व सामाजिक - राजकीय - अध्यात्मिक जीवनातील प्रत्येक क्षणी मला रामनामाच्या शक्तीचाच भक्कम आधार लाभलेला आहे.

❑ *'आत्मकथा' मधून साभार*

## डॉ. राममनोहर लोहिया यांच्या शब्दात

# राम एक आदर्श



भारतातील बहुतेक राजनेत्यांपुढे 'राम' हा एक आदर्श राहिलेला आहे, मग ते राजनेते महात्मा गांधी असोत वा समाजवादी विचारसरणीचे लोकनेते - विचारवंत डॉ. राम मनोहर लोहिया असोत.

आम्ही येथे थोर चिंतक डॉ. लोहिया यांनी श्रीरामचंद्रांबद्दल लिहिले एक संक्षिप्त टिपण प्रसिध्द करीत आहोत -

'भारत एक आहे.

भारताचा इंग्रजांनी लिहिलेला इतिहास मूर्खपणाने लिहिला आहे. तो वाचून पंडित मंडळींनी भारतीय ऐक्याविषयी जी कल्पना करून घेतली आहे त्यापेक्षा भारत जास्त एक आहे.

- राम, कृष्ण आणि शिव खरोखरच कधी होऊन गेले आहेत काय हा प्रश्न फारसा महत्त्वाचा नाही. कोट्यावधी भारतीयांच्या मनावर राम, कृष्ण, शिव यांच्या अनेक लहान मोठ्या कथा-कहाण्यांचा गेली शेकडो वर्षे जबरदस्त प्रभाव आहे, ही वस्तुस्थिती आहे. या तिघांइतक्या जनमानसावर प्रभुत्व असलेल्या अन्य व्यक्ती हिंदुस्थाच्या इतिहासात सापडणारच नाहीत.

- राम, कृष्ण, शिव यांची नावे धर्माशी जोडलेली आहेत म्हणून काही केवळ त्या व्यक्ती लोकप्रिय झालेल्या नाहीत. मानवी जीवनातील आदर्श म्हणून या त्रिमूर्तीकडे भारतीय जनता पाहत आली आहे. जीवनातील प्रत्येक व्यवहाराच्या प्रसंगी या तीन व्यक्तींची जीवने आदर्श म्हणून जनतेच्या नजरेसमोर उभी असतात व कळत न कळत लोक या आदर्शाचे अनुकरण करीत असतात, विचारपूर्वक मानलेल्या आदर्शापेक्षा अशा प्रकारचे न कळत स्वीकारलेले आदर्शच अधिक प्रभावी असतात.

- अशा महान व्यक्तिंच्या कथा - कहाण्यांत देशातील माणसांचे हास्य आणि स्वप्ने कोरलेली असतात. हास्य आणि स्वप्ने यापेक्षा श्रेष्ठ अशी दुसरी कोणतीही गोष्ट नाही. राष्ट्र हसते तेव्हा ते प्रसन्न समाधानी असल्याचे प्रतीक असते. त्यावेळी त्याचे काळीजही विशाल असते. राष्ट्र स्वप्न पाहत असते तेव्हा ते आपल्या आदर्शामध्ये रंग भरून कथा गुंफीत असते. रामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हणतात. या त्याच्या नामाभिधानातच रामाचे सर्वश्रेष्ठत्व व्यक्त होते. राम मन मानेल तसं वागत नाही. त्याच्या वर्तनाला रेखांकित परिघ आहे. नीती वा शास्त्र अथवा धर्म वा व्यवहार यांच्या परिघात रामाची शक्ती मर्यादित आहे.

राम हा उत्कृष्ट श्रोता होता. थोर माणसाने तसेच असले पाहिजे. रामाला मौनातील जादू माहीत होती. मर्यादापुरूषोत्तम राम म्हणजे एक अद्‌भुत राजकीय व्यक्तिमत्त्व होते.

- मी इतकेच म्हणेन की, " हे भारतमाते आम्हाला शिवाची बुध्दी दे, कृष्णाचे हृदय दे आणि रामाचा एकवचनीपणा व कर्मशक्ती दे.

असीमित बुध्दी, उन्मुक्त हृदय आणि मर्यादायुक्त जीवन यांनी आमचे जीवन सृजन कर.

❑ *'ललितलेणी' मधून साभार*

# श्री रामचंद्रांचा जयजयकार कशासाठी ?

❑ शि. म. परांजपे

*'काळ' कर्ते शि. म. परांजपे यांच्या निबंधमालेने स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांमध्ये केलेली जनजागृती सर्वश्रुत आहे. जनजागृतीसाठी त्यांनीही प्रभु रामचंद्रांच्या पराक्रमी व्यक्तिमत्वाचा आदर्श लोकांपुढे ठेवला. काळ कर्त्यांची लेखन शैली ही एक खास शैली होती. त्या शैलीचा परिचय होण्याबरोबरच त्यांनी केलेले श्रीरामाचे गुणगायन वाचकांना कळावे या हेतूने आम्ही 'काळ' मधील एका वैचारिक निबंधाचे येथे पुनर्मुद्रण करीत आहोत. -*



आपण रामाला कधी पाहिलेले नाही व तो होऊन गेल्याला किती हजार वर्ष लोटली असतील, याचाही आदमास आपल्याला नाही. तरीपण आपण त्यांच्या भजनातच तल्लीन होऊन जातो. व याची कारणेही अनेक आहेत. श्री रामचंद्र हा प्रत्यक्ष विष्णुचा अवतार होय, असे आपली पुराणे आपल्याला सांगत आहेत. व असा आपलाही (सुधारक खेरीज करून) सर्वांचा निश्चय झालेला आहे. श्रीरामचंद्र हा प्रत्यक्ष परमेश्वरच होता, अशा दृष्टीने पाहिले म्हणजे श्रीरामचंद्राचा आज जो महिमा गाजत आहे तो अगदी यथायोग्यच आहे असे म्हटल्यावाचून कोणाच्यानेही राहवणार नाही. परंतु रामायणातील कथाभाग आपण वाचू किंवा ऐकू लागलो म्हणजे श्रीरामचंद्र हा प्रत्यक्ष परमेश्वर होता, ही गोष्ट आपण क्षणभर विसरतो, आणि रामाचा सीतेशी विवाह झाला म्हणून आपण आनंद पावतो, रामाला त्याच्या बापाने अरण्यात धाडले म्हणून आपण खिन्न होतो. आणि रामाच्या बायकोला रावणाने चोरुन नेले म्हणून आपण अश्रू गाळतो. राम जर ईश्वर होता तर त्याला बाप किंवा बायको असे, किंवा तो बाप मरणे आणि ती बायको चोरीस जाणे, या गोष्टी संभवणार नाहीत. तात्पर्य जरी

श्रीरामचंद्र हा प्रत्यक्ष विष्णूचा अवतार होता तरी त्यांनी मनुष्याचा देह धारण केला होता, ही गोष्ट विसरता कामा नये. व त्यादृष्टीने पाहिले असता आज जो त्याचा महिमा गाजत आहे, याला काहीतरी श्रीरामचंद्रांच्या अंगचे अलौकीक गुणच कारण झाले असले पाहिजेत, हे अगदी उघड आहे. परमेश्वर पाहिजे ती गोष्ट करील. परंतु मनुष्याने ती केली असता त्याच्याबद्दल लोकांच्या मनांत गौरव उत्पन्न होतो. अशा गोष्टी श्रीरामचंद्रांच्या चरित्रामध्ये अनेक आहेत, व त्या आपल्या लोकांना विदित आहेत. रामाच्या अंगचे गुण काय होते, हे सर्व आबालवृध्दांना माहित आहेत.

श्रीरामचंद्रांची सर्वच कृत्ये लोकोत्तर होती. परंतु त्यातल्या त्यात त्याने रावणाला मारिले, हे कृत्य अतिशय लोकोत्तर होते. सत्य भाषण करणारे आणि एक पत्नी व्रताने चालणारे लोक थोडे आहेत असे नाही. पण त्या लोकांच्या या गुणाबद्दल कोणी त्यांच्या जयंत्या केल्या नाहीत, किंवा त्यांना कोणी देव मानिले नाही. रामाच्या वेळेपासून आतापर्यंत रामाचा जयघोष चालला आहे तो रामाने बापाची आज्ञा पाळली, किंवा राम एक पत्नीव्रतधारी होता म्हणून नव्हे. तर त्याने रावणासारख्या बलाढ्य पण दुष्ट राजाला मारला म्हणून. राम हा 'TYRANT KILLER' म्हणजे जुलमी राजाला मारणारा होता व ह्याच त्याच्या कृत्याने त्याची किर्ती अजरामर झालेली आहे, आणि त्याची मूर्ती देव्हाऱ्यामध्ये जाऊन बसलेली आहे. जो कोणी 'TYRANT KILLER' असतो, त्याला सर्व काळी सर्व देशातील लोक देवाप्रमाणे मान देत आले आहेत व तीच स्थिती रामासंबंधाने आहे.

## रावणाचे अन्याय

रावणापासून त्यावेळच्या सर्व प्रकारच्या लोकांना अतिशय त्रा, सोसावा लागत होता. पूर्व जन्मीची त्यांची थोर पुण्याई, त्यांच्या पूर्वजांची थोर तपश्चर्या, व स्वतः त्यांचेही तपश्चरण फार उग्र व खडतर, इत्यादी अनेक कारणांमुळे रावणाला राज्य प्राप्ती झाली खरी, परंतु त्याचा त्याने सत्कर्माकडे उपयोग केला नाही. तरी आपल्या सत्तेच्या जोरावर अनेक अनन्वित आणि जुलमाची कृत्ये करून आपले नाव त्याने जुलमी राजांच्या यादीत पहिल्या नंबरवर आणून ठेवले. त्याचे पहिले अन्यायाचे कृत्य म्हटले म्हणजे लंका शहर घेणे हे होय. लंकाही पूर्वी रावणाचा भाऊ कुबेर याजकडे होती. त्याला रावणाने प्रथमतः असा निरोप पाठविला की, लंका हे शहर माझ्याविशेष सोयीचे असल्यामुळे ते मला पाहिजे आहे, ते तू बऱ्याबोलाने द्यावे हे चांगले. अशी सौम्य शब्दांनी कडक धमकी दिल्या बरोबर बिचाऱ्या कुबेराने मुकाट्याने लंका शहर रावणाच्या हवाली केले आणि आपण हिमालयाच्या डोंगरामध्ये राहण्याकरीता गेला. अशारितीने मुळच्या धन्याला डोंगराच्या गुहेत राहायला लावून या जुलमी राजाने आपल्या राजधानीचे ठाणे लंका शहरात बसविले. नंतर त्यांनी यक्ष, गंधर्व, किन्नर, देवर्षि वगैरे लोकांना त्रास द्यायला सुरवात केली. व इंद्राच्या नंदनवनात जाऊन त्या त्रिभुवनातील अतिशय सुंदर आणि मनोहर अशा बागेची त्याने अगदी धुळधाण उडवून टाकली. यक्ष, गंधर्व, वगैरे लोकांनी रावणाचा काही अपराध केला होता असे नाही, तरी पण जुलमी राजाचा हा स्वभावच की, ज्यांनी त्यांना कधीकाळी इतकाही त्रास दिला नसेल, अशा निरपराधी गरीब लोकांवरही ते आपल्या जुलमी अंमलाची पराकाष्ठा करावयाचे. तसेच नंदनवनाच्या बगीच्यात बसून रावण तेथील सुहासिक फुलांचा वास घेता, तर ती फुले त्याला वास देतीना असे नाही. पण शत्रुचे बाग बगीचे, राजवाडे वगैरे आपल्या हस्तगत झाले म्हणजे त्याचा उपभोग घेण्यापेक्षा त्याचा विध्वंस करण्याकडेच बहुतेक जुलमी राजाची प्रवृत्ती असते. तिच्यापुढे कोणाचा काय इलाज चालणार ? ही रावणाची कृत्ये पाहून कुबेराला वाईट वाटले व त्याला चार उपदेशाच्या गोष्टी सांगण्याकरीता कुबेरानी आपला एक दूत रावणाकडे पाठविला. परंतु त्या दूताला जागच्या जागी ठार करून रावणाने खुद्द कुबेरावर हल्ला करण्याचा निश्चय केला. सापाला कोणी दूध पाजू लागले तर तो त्या दूध पाजणारालाही दंश केल्यावाचून कधी राहाणार नाही, आणि जुलुमी राजा हा या बाबतीत सापापेक्षा अधिक चांगला असेल, असे मानण्याला मुळीच कारण नाही असो. रावणाचे आणि कुबेरचे अखेरीस युध्द जुंपले व त्या युध्दात कुबेराचा पराजय आणि रावणाचा जय झाला.

## कडेलोटासाठी शिखरावर

'यतो धर्मस्ततो जयः ' हे आपले तत्त्व लढाईमध्ये कधी कधी एका बाजूला राहून जगात अतिशय जुलुमाचा, जबरदस्तपणाचा, अन्यायाचा आणि अधर्माचा जो पक्ष असेल, त्यालाच जय मिळतो असे खरे. पण ज्याला कडेलोटाची शिक्षा द्यावयाची असेल, त्याला पाहिल्याने कड्याच्या शिखरावर उंच चढविलेच पाहिजे. एरवी ती कशी देता येईल ? पण याच न्यायाने आपल्याला मधून मधून जय मिळत असतात, हे कोणत्याही जुलुमी राजाच्या लक्षात येत नाही, तर तो उलट असेच समजत असतो की, माझ्यावर देवाची मोठी मेहेरबानी आहे, व म्हणूनच तो मला एकामागून एक जय मिळवून देत आहे. पण जेव्हां अशा रीतीने ही अन्यायाची टेकडी पूर्णपणे चढली जाते, व तो खोल तुटलेला कडा जेव्हां जुलुमी राजांच्या दृष्टीस पडतो, तेव्हां त्यांचे डोळे फाटून जातात व आपण देवाच्या मर्जीतले, देव आपल्यावर फिदा. परमेश्वराच्या इच्छेनुरुप आपण